अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | मंगळवार, दि. २० जून २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : २६१ वा किंमत : ५ रुपये | पाने ८


## पहिल्या कसोटीवर ऑस्ट्रेलियाचे वर्चस्व; इंग्लंडचा डाव २७३ धावात आटोपला



इंग्लंड : अॅशेस कसोटीतील पहिल्या सामन्यात यजमान इंग्लंडचा दुसरा डाव २७३ धावांत आटोपला. पहिल्या डावात इंग्लंडकडे सात धावांची आघाडी होती. पॅट कमिन्सच्या नेतृत्वातील ऑस्ट्रेलियाला कसोटी जिंकण्यासाठी २८१ धावांचे आव्हान मिळाले आहे. इंग्लंडचा दुसरा डाव झटपट आटोपला.

एकाही फलंदाजाला अर्धशतकी खेळी करता आली नाही. इंग्लंडकडून जो रूट आणि हॅरी ब्रूक यांनी प्रत्येकी ४६-४६ धावांचे योगदान दिले. त्याशिवाय कर्णधार बेन स्टोक्स याने ४३ धावांची खेळी केली. ऑस्ट्रेलियाचा कर्णधार पॅट कमिन्स आणि नॅथन लायन यांनी प्रत्येकी ४-४ विकेट घेतल्या आहेत. जोश हेजलवूड आणि स्कॉट बोलँड यांनी प्रत्येकी एक एक विकेट घेतली. पहिल्या कसोटी सामन्यात विजय मिळवण्यासाठी ऑस्ट्रेलियाला २८१ धावांची आव्हान आहे. ऑस्ट्रेलियाने चांगली सुरुवात केली आहे. आतापर्यंत एक विकेटच्या मोबदल्यात ७० धावांपर्यंत मजल मारली आहे. डेविड वॉर्नर ३६ धावा काढून तंबूत परतलाय. पहिल्या डावात शतकी खेळी करणारा उस्मान ख्वाजा अद्याप मैदानावर आहे, त्याच्याकडून ऑस्ट्रेलियाला मोठ्या खेळीची आपेक्षा असेल. त्याशिवाय स्टिव स्मिथ आणि मार्नस लाबुशन यांच्या योगदानाकडे ऑस्ट्रेलियाच्या चाहत्यांचे लक्ष असेल.

# अवैध वाळूचा उपसा रोखणाऱ्या ग्रामपंचायत सदस्यावर हल्ला

- बेशुध्दावस्थेत असल्याने जबाबही नाही, फिर्यादही नाही
- बार्शी तालुक्यातील खांडवी येथील घटना

सुराज्य/बार्शी

**बार्शी तालुक्यातील खांडवी गावचे ग्रामपंचायत सदस्य आकाश दळवी यांच्यावर गावाजवळच्या ढोर ओढ्याच्या पात्रातील अवैध वाळूचे उत्खनन करण्यास विरोध केल्यामुळे अज्ञात इसमांनी त्यांच्यावर प्राणघातक हल्ला केल्याची घटना घडली आहे. याबाबत बार्शी तालुका पोलीस स्टेशनने या घटनेची नोंद घेतली असली तरी सदर प्रकरणातील जखमी दळवी हे बेशुद्ध अवस्थेमध्ये असल्यामुळे त्यांचा जबाब नोंदवला गेला नसून याबाबत रात्री उशिरापर्यंत फिर्याद नोंदवण्यात आलेली नाही. दरम्यान महसूल प्रशासन या सर्व प्रकरणावरून चिडीचूप्प आहे. त्यांनी या घटनेची अद्याप कुठलीही दखल घेतली नाही.**



याबाबत मिळालेली माहिती अशी की, आकाश पांडुरंग दळवी हे खांडवीचे ग्रामपंचायत सदस्य असून माहितीचा अधिकार चळवळीतील कार्यकर्ते आहेत. दळवी यांनी दि.१९ जून रोजी मध्यरात्री १ वाजता खांडवी ते कव्हेकडे जाणाऱ्या रस्त्यावर गोडसेवाडीजवळ असणाऱ्या ढोर ओढ्यातील पात्रामध्ये वाळूचे उत्खनन सुरू असल्याचा व्हिडीओ आपल्या भ्रमणध्वनीवरून प्रसारित केला होता. या चित्रीकरणामध्ये दळवी हे आपल्या दोन सहकाऱ्यांसह सदर ठिकाणी येऊन दोन ट्रॅक्टर व एका जेसीबी मशिनच्याव्दारे वाळू उपसा व भरून नेण्याचे काम करणाऱ्यांना आडवताना दिसतात. दळवी तेथे आल्यानंतर सदर ट्रॅक्टर चालक व जेसीबी चालक यांनी वाहनांसह पोबारा केल्याचे या चित्रीकरणात दिसते आहे. त्यापैकी जेसीबीचा पाठलाग करून दळवी यांनी सदर जेसीबीला थांबविल्याचेही दिसते आहे. तसेच सदर उत्खनन कोणाचे आहे याबाबतही दळवी संबंधित इसमांना विचारणा करत असल्याचे या चित्रीकरणामध्ये दिसते. सदर घटना घडल्यानंतर दळवी हे रस्त्यावर आले असताना त्यांच्यावर हल्ला झाल्याने ते जखमी झाले. त्यांना येथील जगदाळे मामा हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले. दळवी यांना गंभीर मारहाण झाली असल्याचे वैद्यकीय सूत्रांनी सांगितले. या मारहाणीमध्ये दळवी यांच्या डोक्यास पाठीमागे जोरास मार लागला असून त्यांचे हात व पायाला फ्रॅक्चर झाल्याचे कळते. याबाबत दळवी यांच्या कुटुंबीयांनी हल्लेखोरांबाबत माहिती नसल्याचे सांगितले. दळवी यांच्यावर उपचार चालू असून त्यांच्यावर मंगळवार दि.२० जून रोजी सकाळी शस्त्रक्रिया करण्यात येणार असल्याचे त्यांच्या सहकाऱ्यांनी सांगितले. दळवी बेशुद्धावस्थेत असल्याने पोलिसांनी अद्याप त्यांचा जबाबही नोंदविला नाही वा फिर्यादही घेतली नाही.

### यापूर्वी अवैध धंद्याबाबत आवाज उठविला

दळवी यांनी चार दिवसांपूर्वी बार्शीचे तहसीलदार व उपविभागीय पोलीस अधिकारी यांना बार्शी तालुक्यातील शहर व पांगरी तसेच वैराग येथील पोलीस स्टेशनमध्ये गेल्या तीन वर्षात खोटे गुन्हे दाखल करण्याचे प्रमाण वाढले असून या प्रकारांना आळा घालण्याबाबत निवेदन दिले होते. या निवेदनामध्ये तालुक्यातील मटका, जुगाराचे अड्डे, अवैध गौण खनिज उत्खनन, गांजा व तत्सम अमली पदार्थांची वाहतूक, रेशिनिंग धान्याचा काळा बाजार आदी अवैध व्यवसाय यावर कारवाई करावी असे म्हटले होते.

### जाहीर निषेध... जाहीर निषेध..




बार्शी तालुक्यातील भ्रष्टाचार अवैध वाळूचोरी व अवैध धंद्याविरुद्ध लढणारे सामाजिक कार्यकर्ते आकाश दळवी यांच्यावर जीवघेणा हल्ला करण्यात आला आहे या हल्लेखोरांना अटक करण्याची मागणी राष्ट्रीय चर्मकार महासंघ शहर जिल्हा सोलापुरच्या वतीने पोलीस अधीक्षक यांना करण्यात आली आहे अन्यथा संघटनेच्या वतीने राज्यभर तीव्र आंदोलन करण्यात येईल.

## मॅजेस्टेड कस्टडीमधील फरार आरोपीला सापळा लावून पकडले

सुराज्य/सोलापूर

चोरीच्या गुन्ह्यातील आरोपी जिल्हा कारागृहातून शासकीय रुग्णालयात उपचारासाठी आणल्यानंतर बाथरूमची काच फोडून पळाला.सोमवारी पहाटे दोनच्या सुमारास ही घटना घडली.तातडीने पोलिसांनी सापळा लावून पहाटे तीनच्या सुमारास ताब्यात घेण्यात आले.

संदीप रोहिदास धोत्रे (वय १९, रा. कुई, ता. माढा) असे पळून जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीचे नाव आहे.आरोपी संदीप विरुद्ध करमाळा पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल आहे. या गुन्ह्यात त्याला न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. सध्या तो जिल्हा कारागृहात होता. त्याची प्रकृती ठीक नसल्याने त्यास उपचाराकरिता शासकीय रुग्णालयातील ए ब्लॉक मध्ये दाखल करण्यात आले होते. रविवारी १८ जूनच्या मध्यरात्री दोन वाजता तो रुग्णालयातील बाथरूममध्ये गेला होता. त्यादरम्यान त्याने बाथरूमची काच फोडून बाहेर पडला.त्यावेळी त्याच्या बंदोबस्तासाठी पोलीस बाथरूमच्या बाहेरच उभे होते. बराच वेळ झाल्यानंतरही आरोपी संदीप बाथरूमच्या बाहेर आला नसल्याने संशय निर्माण झाला.

आरोपी बाथरूममध्ये नसल्याचे दिसून आले.तातडीने पोलिसांनी सदर बझार पोलीस ठाण्याला खबर दिली. त्यानंतर पोलिसांकडून आरोपीचा शोध घेण्याचे काम सुरू असतानाच, डफरीन चौक ते पार्क चौक दरम्यान मध्यरात्री तीन वाजण्याच्या सुमारास आरोपी संदीप पोलिसांना मिळून आला. त्याला ताब्यात घेऊन त्याच्याविरुद्ध सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदला आहे.पुढील तपास पो. कॉ.ईप्पलपल्ली हे करीत आहेत.

## सोलापुरात मुलीच्या अपहरणाचा प्रयत्न फसला

११ वर्षाच्या मुलीने दाखवले धाडस, घटना सीसीटीव्हीत कैद

सुराज्य/सोलापूर

सोलापुरात सध्या एक मॅसेज मोठ्या प्रमाणात वायरल झाला आहे तो म्हणजे शहरातील बाळीवेस परिसरात एका अकरा वर्षीय मुलीला अपहरण करण्याचा प्रयत्न झाला परंतु त्या मुलीने आपले धाडस दाखवत त्या इसमाच्या हातून आपली सुटका करून घेतली. या घटनेने खळबळ तर उडाली आहेच परंतु ही घटना त्या भागातील सीसीटीव्ही मध्ये कैद झाली आहे.

शनिवार १७ जून रोजी सकाळच्या सुमारास घटना आहे. टिळक चौकाकडून वीरभद्र मंदिरकडे जाणाऱ्या रोडवर सकाळच्या सुमारास सहसा वर्दळ नसते. त्याचाच फायदा घेऊन एक इसम त्याचा एका हाताला रुमाल बांधून दुसऱ्या हातात कोणती तरी पावडर घेऊन जात होता. त्याचवेळेस एक अकरा वर्षे मुलगी हातात पिशवी घेऊन डाव्या बाजूने जात होती. तो इसम थोडासा वेगाने चालत तिच्या आडवा गेला तेव्हा ती मुलगी आपल्या उजव्या बाजूला गेली. त्या माणसाने लगेच तिला हाताला



धरून ओढले आणि एका पायरीवर जाऊन बसला तेवढ्यात त्या मुलीने त्या इसमाच्या हाताला जोरात झटका मारला आणि जागेवरून उठून लगबगीने निघून गेली. तेवढ्यात तो इसमही तेथून पळून गेला. ही सर्व घटना तेथील सीसीटीव्हीमध्ये कैद झाली आहे. या घटनेमुळे बाळीवेस परिसरात खळबळ उडाली असून बाळीवेस परिसरात राहणारी ही मुलगी असल्याचे समजले.

दरम्यान त्या मुलीच्या धाडसाचे कौतुक होत आहे. संशयित इसमाचा फोटो ही सीसीटीव्हीत कैद झाला आहे. मुलीच्या कुटुंबीयांनी फौजदार चावडी पोलिसात तक्रार दिल्याची माहिती मिळाली.

## सोलापुरातील ७१ हजार घरांचा सर्व्हे पूर्ण

### हजारो मिळकतींची नोंदच नाही

सुराज्य/सोलापूर



बऱ्याच वर्षापासून सोलापूर शहरात वाढीव मिळकतींच्या शोध घेण्याची मोहीम घेतली जात नव्हती. महापालिका आयुक्त शीतल तेली-उगले यांनी मात्र १२५ पथके स्थापन करून त्यांच्यामार्फत घरोघरी जाऊन मिळकतींचा सर्वे सुरू केला आहे. आतापर्यंत ७१ हजार १०६ मिळकतींचा सर्वे झाला असून यातून हजारो मिळकतींची नोंदच महापालिकेकडे नसल्याची माहिती उघड झाली आहे.

महापालिकेच्या वतीने मिळकत कर विभागाअंतर्गत सोलापूर शहरातील सर्व मिळकतींचे सर्वंकष सर्वेक्षण दि.१५ मे २०२३ पासून सुरू करण्यात आले आहे. नियोजनबद्ध कृती आराखडा तयार करून या सर्वेक्षणाचे काम सुरू करण्यात आले आहे. संबंधित कर्मचाऱ्यांना यापूर्वीच दोनदा प्रशिक्षण देण्यात आले. मिळकतदारांच्या घरोघरी जाऊन गुगल फॉर्म भरून सर्व माहिती संकलित करण्यात येत आहे.

एकूण १२५ पथकांच्या माध्यमातून हे सर्वेक्षण हाती घेण्यात आले आहे.


सोलापूर शहरात शहर व हद्दवाढ भागात सुमारे दोन लाख ५० हजार मिळकती आहेत. पेठनिहाय हे सर्वेक्षण करण्यात येत आहे. शहरात एकूण ५० पेठ आहेत. सर्व पथकांकडून सर्वेक्षणाचे काम हाती घेण्यात आले आहे. सुरुवातीला प्रत्येक पथकास रोज साधारणता: ४० ते ५० मिळकतीं सर्वेक्षणाचे उद्दिष्ट देण्यात आले होते. मात्र त्यानंतर सर्व्हेचे उदिष्ट वाढवण्यात आले आहे. सोमवारी एकाच दिवशी साडेतीन हजार घरांपेक्षा जास्त घरांचा सर्व्हे करण्यात आला. आतापर्यंत ३५ दिवसात ७१ हजार १०६ मिळकतींचा सर्वे झाला आहे. यात हजारो मिळकतींची नोंद महापालिकेकडे नसल्याचे उघड झाली आहे. सोलापूर शहरात शहर व हद्दवाढ भागात सुमारे दोन लाख ५० हजार मिळकती आहेत. संपूर्ण घरांचा सर्वे झाल्यानंतर महापालिकेकडे नोंद नसलेल्या मिळकतींचा आकडा मोठा असण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. शिवाय अनेकांनी वाढीव बांधकामे केली आहे, याचीही नोंद महापालिकेकडे झालेली नाही.

### कोट्यवधींचे वाढीव उत्पन्न मिळण्याची शक्यता

महापालिकेकडून करण्यात येत असलेला सर्वंकष सर्वे जर अधिकाऱ्यांनी कर्मचाऱ्यांनी प्रामाणिकपणे केला तर महापालिकेकडे नोंद नसलेल्या मिळकतीन सापडणार आहेत याशिवाय वाढीव बांधकामाची नोंद ही महापालिकेत होणार आहे. यामुळे सोलापूर महापालिका सुमारे कोट्यवधी रुपयांचे वाढीव उत्पन्न टॅक्सच्या माध्यमातून मिळण्याची शक्यता आहे.

## आषाढीसाठी उजनी धरणातून अडीच टीएमसी पाणी सोडण्यात येणार

सुराज्य/सोलापूर



पंढरपूरच्या आषाढी एकादशी निमित्त उजनी धरणातून अडीच टीएमसी पाणी सोडण्यात येणार असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार यांनी दिली.

राज्यात आषाढी वारी जवळ आली आली आहे. सर्व दिंड्या पंढरपूर कडे मार्गस्थ झाले आहे. लाखो वारकरी पंढरपुरात आषाढी वारीसाठी दाखल होता.वारकऱ्यांना सोई सुविधा देण्यासाठी प्रशासन सज्ज आहे. रस्ते, पाणी, शौचालय आरोग्य शिबिर यासह वारीचे नियोजन केले जात आहे. मोठ्या प्रमाणात येणाऱ्या वारकऱ्यांची चंद्रभागा नदी स्थान करण्याची मोठी परंपरा आहे. सध्या राज्यात पावसाने अद्याप ओढ दिली आहे. यंदा वारकऱ्यांची मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे. असल्याने पाटबंधारे विभागाच्या वतीने उजनी धरणातून पाणी सोडण्यात येणार आहे. जवळपास अडीच टीएमसी पाणी सोडले जाणार आहे. २१ जून रोजी उजनी धरणातून साडे चार हजार क्युसेक्स वेगाने पाणी सोडण्यात येणार असून हे पाणी २४ जून रोजी पंढरपुरात पोहचणार आहे. या सोडलेल्या पाण्यामुळे सोलापूर शहराला पाणी पुरवठासाठी मदत होणार आहे. सोडलेले पाणी औज बंधाऱ्यात पाणी येणार असल्याने सोलापूर शहराचा पाणीपुरवठयाचा प्रश्न देखील दोन महिने मिटणार आहे.

## सेंट्रींग काम करणाऱ्या मिस्त्रीचा सांगोल्यात खून

सुराज्य/सांगोला

सांगोला रेल्वे स्टेशनसमोरील मिरज नाका ते वंदे मातरम या बायपास रोडवर सेंट्रींग काम करणारा मिस्त्री संतोष जगन्नाथ साळुंखे (वय ४५) याचा अज्ञात कारणावरून दगडाने ठेचून खून केल्याची घटना सोमवार १९ जून रोजी सकाळी नऊच्या सुमारास घडली. यामुळे शहरात खळबळ उडाली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, संतोष साळुंखे हा सांगोला येतील मुकादम शाहिद जाफर मुलाणी यांच्याकडे सेंट्रींग चे काम करीत होता. जेथे काम असेल त्या कामाच्या ठिकाणी तो राहत असे. त्याला दारूची व्यसन होते. रविवारी दुपारी बाराच्या सुमारास ठेकेदार कडून पंधराशे रुपये पगार घेऊन तो गेला. त्यानंतर त्याचे प्रेतच सोमवारी सकाळी नऊच्या सुमारास बायपास रोडवर पोलिसांना दिसून आले. त्यानंतर पोलिसांनी अकोला येथे राहत असलेली त्याची मुलगी अश्विनी संदेश निकम हीस माहिती दिली. त्यानुसार अश्विनी निकम यांनी मयत हा आपला वडीलच असल्याचे सांगितले व त्यांनी सांगोला पोलीस स्टेशनमध्ये फिर्याद दाखल केली.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



या वादळाला बिपर'जॉय' नाव कोणी दिले ?

| कल्याण |
|---|
| 445-30-550 |

| मेन बाजार |
|---|
| 580-35-348 |

## निमगावात बिबट्याचा थरार...

- शेतकऱ्याच्या बकऱ्यावर केला हल्ला
- खुणा पाहून पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिला दुजोरा

सुराज्य/पिलीव

**माळशिरस तालुक्यातील निमगाव येथे निमगाव-मळोली रस्त्यालगत रविवार दि.१८ जून रोजी उपसरपंच नंदकुमार पाटील यांच्या घराच्या पूर्वेस मळोली हद्दीमधील शेतात चरणाऱ्या बकऱ्याच्या कळपावर बिबट्याने हल्ला केल्याने आसपास परिसरात भितीचे वातावरण पसरले आहे.**

निमगाव ता माळशिरस येथे निमगाव - मळोली रस्त्यालगत मंगळवार दि ६ जून रोजी रात्री ८.३० वा सदाशिव नारायण मिसाळ व उपसरपंच नंदकुमार पाटील यांच्या शेताजवळ वेळापूर येथील इसमास बिबट्या सदृश प्राणी दिसल्याने आसपासच्या परिसरात भीतीचे वातावरण पसरले यानंतर या बिबट्याचा वावर दिसेनासा झाल्यानंतर पुन्हा रविवार दि १८ जून रोजी पुन्हा बिबट्याने हल्ला केला.

निमगाव येथील काशिनाथ बोडरे रा. ६५ फाटा यांचा मुलगा किशोर बोडरे हा आपल्या मेंढराच्या कळपाला घेऊन निमगाव मळोली शिवेलगत असणाऱ्या रणनवरे यांच्या शेतात बकरे चारत असताना १८ जून रोजी दुपारी ३ ते ३.१० मिनिटांच्या दरम्यान बिबट्याने दोन वर्षे वयाच्या बकऱ्यावर हल्ला करून बकऱ्याच्या डाव्या बाजूस साधारणपणे ६ सेंटिमीटर लांबीची जखम केले. बिबट्या पाहताच मेंढरांबरोबर असणारी कुत्री भुंकायला लागली किशोर बोडरे यांनी आरडाओरड केल्यानंतर व कुत्र्याच्या आवाजाने बिबट्या तिथून पसार झाला. यानंतर लागलीच खाजगी पशुवैद्यकीय अधिकारी यांना या ठिकाणी पाचारण करण्यात आले.

त्यांनी सदर बकऱ्याच्या डाव्या बाजूस असणाऱ्या त्या जखमेवर औषध उपचार करून साधारणपणे दहा टाके घालून जखम झाकून टाकली. मात्र या परिसरात या बिबट्याच्या वावराने भीतीचे वातावरण पसरले आहे. दि. १८ जून रोजी सकाळी हाच बिबट्या विश्वनाथ (बापू) नानासो मगर यांच्या शेतात वावरत असल्याच्या खुणा दिसून आल्या ६ जून रोजी च्या पायांच्या ठशावरून वन विभागाने हा प्राणी बिबट्या असल्याचे सांगून हा बिबट्या पकडण्यासाठी पिंजरा लावण्यात आला होता. मात्र बिबट्या त्यामध्ये अडकला नाही वन विभागाने लवकरच या बिबट्याचा बंदोबस्त करावा अशी मागणी होत आहे.

> मी रणनवरे यांच्या शेतात माझी मेंढरे चारत असताना रविवार दि १८ जून रोजी दुपारी ३ ते ३.१० च्या दरम्यान बिबट्याने माझ्या बकऱ्यावर हल्ला केला साधारणपणे मी तो बिबट्या ३०० फूट अंतरावरून स्पष्ट पाहिला असून कुत्र्याचा व माझा मोठा आवाज ऐकून तो बकऱ्याला सोडून उसाच्या शेतात पळून गेला
>
> **- किशोर बोडरे,**
> बिबट्या पाहणारा प्रत्यक्षदर्शी



# पीएसयूचा लेखाजोखा...

देशभरात रोजगार मेळावे आयोजित करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते हजारो उमेदवारांना नियुक्तिपत्रे देण्याचे सोहळे केंद्र सरकारकडून घडवले जात आहेत. मात्र, केंद्र सरकारचे अंग असलेल्या सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांमध्ये (पीएसयू) गेल्या दहा वर्षांत जवळपास दोन लाख ७० हजार नोकऱ्या घटल्याचा धक्कादायक अहवाल समोर आला आहे. सार्वजनिक उद्योगांच्या कामगिरीचा लेखाजोखा मांडणाऱ्या वार्षिक अहवालांचा २०१३ ते २०२२ या दशकातील आढावा घेतला असता या कंपन्यांत कायम स्वरूपी रोजगाराऐवजी कंत्राटीकरणावर भर दिल्याचेही दिसून येते. केंद्र सरकारकडे संपूर्ण किंवा अंशत: मालकी असलेल्या कंपन्यांना सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांच्या वर्गात स्थान देण्यात येते. या कंपन्यांतील ५० टक्के किंवा त्याहून अधिक हिस्सा केंद्र सरकारच्या ताब्यात असतो. सध्या केंद्र सरकारच्या ताब्यात ३८९ सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्या असून त्यापैकी २४८ सुरू आहेत. यामध्ये विविध तेल कंपन्या, बँका, वीजनिर्मिती कंपन्यांचा समावेश आहे. सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांच्या एकूण आर्थिक स्थिती, रोजगार, नफा, व्यवसाय आदी बाबींचा लेखाजोखा मांडणारा एक पाहणी अहवाल दरवर्षी प्रसिद्ध केला जातो. या अहवालानुसार मार्च २०१३ मध्ये सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांमध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांची संख्या १७ लाख ३० हजार इतकी होती. ही संख्या मार्च २०२२ मध्ये १४ लाख ६० हजारांवर घसरली आहे. म्हणजे त्या दहा वर्षांत या कंपन्यांतील दोन लाख ७० हजार नोकऱ्या घटल्या आहेत. तज्ज्ञांच्या माहितीनुसार गेल्या दहा वर्षांत एकूण रोजगारातील कंत्राटी वा रोजंदारीवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा टक्का वाढतो आहे. २०१३ मध्ये १७.३० लाख कर्मचाऱ्यांमध्ये कंत्राटी कर्मचाऱ्यांची संख्या दोन लाख ९० हजार इतकी होती, तर रोजंदारी किंवा अंशकालीन



कर्मचाऱ्यांचे प्रमाण चाळीस हजार इतके होते. हीच संख्या मार्च २०२२ मध्ये अनुक्रमे सव्वा पाच लाख आणि एक लाख झाली आहे. म्हणजे, मार्च २०२२ मध्ये एकूण १४.६ लाख कर्मचाऱ्यांपैकी ६.२ कर्मचारी अस्थायी आहेत. हे प्रमाण एकूण रोजगाराच्या ४२.५ टक्के इतके आहे. २०१३ मध्ये अस्थायी कर्मचाऱ्यांचे एकूण रोजगारातील प्रमाण १९ टक्के इतके होते. जाणकारांच्या अभ्यासानुसार गेल्या दहा वर्षांत २० हजारांहून जास्त नोकरकपात केलेल्या सात प्रमुख कंपन्या आढळून आल्या आहेत. त्यात सर्वाधिक नोकरकपात भारत संचार निगम लिमिटेड (बीएसएनएल) मध्ये झाल्याचे सांगण्यात येते. २०१३ मध्ये बीएसएनएलमध्ये २ लाख ५५ हजार ८४० कर्मचारी कार्यरत होते. ही संख्या २०२२ मध्ये घटून ७४,७१३ इतकी उरली आहे. त्याखालोखाल स्टील ऑथोरिटी ऑफ इंडिया (एकूण कपात : ६१९२८), एमटीएनएल (एकूण कपात: ३४९९७) यांचा समावेश आहे. नोकरकपातीवर प्रकाश पाडणाऱ्या या अहवालात गेल्या दहा वर्षांत अधिक रोजगार निर्माण करणाऱ्या कंपन्यांचीही यादी नमूद केलेली आहे. त्या यादीमध्ये इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.मध्ये गेल्या दहा वर्षांत नोकऱ्यांची संख्या ७९,८२८ ने वाढली. त्याखालोखाल महानदी कोलफिल्ड्स लि. (एकूण रोजगार वाढ: ३६,४१८), एनपीसीएल (एकूण रोजगार वाढ: २२,२३५), नॉर्थन कोलफिल्ड्स लि. (एकूण रोजगार वाढ : १७६७४), एचपीसीएल राजस्थान रिफायनरी लि. (एकूण रोजगार वाढ: १६४२२) यांचा समावेश आहे. मात्र यापैकी नेमके किती रोजगार स्थायी, याचे कंपनीवार विवरण येथे नाही. सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांना पोसणे आर्थिकदृष्ट्या परवडत नसल्याचे सरकार म्हणते. मात्र, गेल्या काही वर्षांतील या कंपन्यांचा निव्वळ नफा पाहिल्यास या दाव्यांत पूर्णपणे तथ्य नसल्याचे जाणकार सांगतात.रोजगार सोहळे आयोजित करून सरकार खरी माहिती लपवत आहे की काय?अशी शंका यातून उपस्थित होऊ शकते.

## सामाजिक

# अन्न पूर्णब्रह्म...

**भारतामध्ये अन्नाला फार महत्त्व आहे. प्रत्येक प्रदेशामध्ये अन्नाची आणि अन्नपदार्थांची प्रचंड विविधता आहे. अन्न हे पूर्णब्रह्म असे आपण मानतो. अन्नाला उच्च स्थान आहे. जिकडे जाऊ तिकडचे खाऊ ही आपली संस्कृती आहे. सर्व प्रकारच्या अन्नाचा आदर व त्याचे अनन्यसाधारण महत्त्व अनेक श्लोकांमधून आपल्याला लहानपणी शिकवलेले असते. अन्न वाया घालवणे म्हणजे पाप असे मनावर बिंबवलेले असते. पानातील सर्व अन्न खायचे, टाकून द्यायचे नाही, ही सक्त ताकीद दिलेली असते. हा खरंतर एक संस्कार असतो. पूर्वी अन्न शिल्लक जरी राहिले तरी गायीला खायला देणे, भिक्षुकांना देणे अशा काही पद्धती होत्या. अन्न टाकून देणे किंवा वाया घालवणे हे आपल्या संस्कृतीमध्ये नाही. याउलट उरलेल्या अन्नातून अधिक रुचकर पदार्थ बनवण्याची पद्धती आजही आहे.**

ऑस्ट्रेलियातील अन्न कचऱ्याविषयी नुकताच एक अभ्यास प्रसिद्ध झाला आहे. ऑस्ट्रेलियातील बहुतेक टाकाऊ अन्न आणि बागेतील कचरा घरातून येतो. ऑस्ट्रेलियन कुटुंब दरवर्षी ३.१ दशलक्ष टन अन्न वाया घालवतात. ते दर आठवड्याला प्रत्येक घरामागे ५ किलोग्रॅमपेक्षा जास्त आहे. सर्व घरगुती कचऱ्यापैकी अर्ध्याहून अधिक अन्न आणि बागेतील सेंद्रिय पदार्थ आहेत ज्याला फोगो (फूड ऑरगॅनिक्स आणि गार्डन ऑर्गेनिक्स) देखील म्हणतात. हा सर्व कचरा जमिनीतील भेगांमध्ये (लँडफिल्स) बसतो आणि जेव्हा तो कुजतो तेव्हा धोकादायक हरितगृह वायू उत्सर्जित होतात. जगभरात कमी जास्त प्रमाणात हीच परिस्थिती आहे. त्यामुळे एकतर अन्न वाया घालवू नका किंवा नाईलाजास्तव जे वाया जात आहे, त्याचे खत बनवा आणि पर्यावरणाचे संरक्षण करा.

आज असे चित्र दिसते का? काही प्रमाणात असेलही, पण त्यात अन्न नासाडीची मोठी भर पडली आहे. पानामध्ये अवास्तव प्रमाणात हावऱ्यासारखे वाढून घ्यायचे आणि मग पोट भरले की टाकून द्यायचे तेही कचऱ्याच्या डब्यात किंवा फ्रीजमध्ये बरेच दिवस ठेवून मग टाकायचे. काही ठिकाणी तर अन्नपदार्थ फ्लश केले जातात. ऑस्ट्रेलियातील अन्न कचऱ्याविषयी नुकताच एक अभ्यास प्रसिद्ध झाला आहे. ऑस्ट्रेलियातील बहुतेक टाकाऊ अन्न आणि बागेतील कचरा घरातून येतो. ऑस्ट्रेलियन कुटुंब दरवर्षी ३.१ दशलक्ष टन अन्न वाया घालवतात. ते दर आठवड्याला प्रत्येक घरामागे ५ किलोग्रॅमपेक्षा जास्त आहे. सर्व घरगुती कचऱ्यापैकी अर्ध्याहून अधिक अन्न आणि बागेतील सेंद्रिय पदार्थ आहेत ज्याला फोगो (फूड ऑरगॅनिक्स आणि गार्डन ऑर्गेनिक्स) देखील म्हणतात. हा सर्व कचरा जमिनीतील भेगांमध्ये (लँडफिल्स) बसतो आणि जेव्हा तो कुजतो तेव्हा धोकादायक हरितगृह वायू उत्सर्जित होतात.

२०३० पर्यंत सेंद्रिय कचऱ्याच्या पुनर्वापराचा दर ४७ टक्क्यांवरून ८० टक्क्यांपर्यंत वाढवणे आणि लँडफिलला पाठवलेले अन्न निम्मे करणे हे ऑस्ट्रेलियाच्या फेडरल सरकारच्या राष्ट्रीय कचरा धोरण कृती योजनेचे उद्दिष्ट आहे. अन्न आणि बागेतील कचरा गोळा केला जाऊ शकतो आणि कंपोस्टमध्ये रूपांतरित केला जाऊ शकतो. कंपोस्टिंग हे आता फक्त घरचे माळी किंवा इको-वॉरियरचे क्षेत्र राहिलेले नाही. हे व्यावसायिक स्तरावर होत आहे, घराघरांमधून संकलन समित्यांद्वारे



हे होत आहे. पण एवढे पुरेसे नाही. अन्न कचऱ्याचे उच्च गुणवत्तेच्या कंपोस्टमध्ये रूपांतर करून पुनर्वापर करणे हा लोकांसाठी आणि पृथ्वीसाठी फायद्याचाच उपाय आहे. जमिनीवरील भेगांमध्ये अन्न कुजून मिथेन नावाचा शक्तिशाली हरितगृह वायू बाहेर पडतो. कंपोस्टिंगमध्ये मात्र असे होत नाही. ते वेगळे आहे कारण त्यात निर्माण झालेले सूक्ष्म जंतू श्वास घेतात. ऑक्सिजनच्या उपस्थितीत ते मिथेनची निर्मिती न करता कचऱ्याचे मौल्यवान सेंद्रिय पदार्थात रूपांतर करतात. ते सेंद्रिय कार्बन आणि पोषक घटकांचा कंपोस्टमध्ये पुनर्वापर करतात, ज्याचा उपयोग मातीचे आरोग्य आणि उत्पादकता सुधारण्यासाठी केला जाऊ शकतो. ही प्रक्रिया कार्बन डाय ऑक्साईड वातावरणात सोडण्याऐवजी मातीमध्ये कार्बन पकडून साठवते.

माती कंपोस्टपासून फायदाच मिळतो. कारण जागतिक स्तरावर अंदाजे ११६ अब्ज टन सेंद्रिय कार्बन शेतीच्या मातीतून नष्ट झाला आहे. यामुळे वातावरणातील कार्बन डायऑक्साईडची पातळी वाढण्यास हातभार लागला आहे. कंपोस्ट माती सेंद्रिय कार्बन पुनर्संचयित करते आणि मातीचे आरोग्य आणि सुपीकतादेखील वाढते. कंपोस्ट मातीची रचना आणि पाणी धारणक्षमता सुधारते. ती अत्यावश्यक पोषक तत्त्वांचा स्रोतदेखील आहे आणि महत्त्वाचे म्हणजे यामुळे महाग खतांची मागणी कमी होते.

ऑस्ट्रेलियाच्या शेतांसाठी अत्यंत प्रासंगिक, कोरड्या आणि उबदार हवामानात अचूक कंपोस्टचा सर्वात शक्तिशाली प्रभाव असतो, ज्यामुळे उत्पादन ४० टक्क्यांपर्यंत वाढते. आता आपल्याला शेतांच्या विशिष्ट गरजांसाठी हे धोरण विकसित करण्याची गरज आहे. कंपोस्टमध्ये पीक जमिनीच्या वरच्या थरातील मातीमध्ये १९.५ अब्ज टन कार्बन पुनर्संचयित करण्याची क्षमता आहे जे सध्याच्या वरच्या २० से. मी. थरामधील मातीच्या २६.५ टक्के सेंद्रिय कार्बन साठ्याच्या समतुल्य आहे. ऑस्ट्रेलियातील अन्न आणि बागेतील कचऱ्याचे प्रमाण ऑस्ट्रेलियाच्या लोकसंख्येपेक्षा सहा पटीने आणि सकल देशांतर्गत उत्पादनापेक्षा २.५ पट वेगाने वाढत आहे, परंतु ऑस्ट्रेलियन कुटुंबांपैकी एक तृतीयांशपेक्षा कमी लोकांना अन्न कचरा संकलन सेवा उपलब्ध आहेत.

२०२३ पासून या दशकाच्या अखेरीस राष्ट्रीय रोलआऊट मागे ढकलले गेले आहे. त्यामुळे काही अडथळे दूर करण्यासाठी वेळ लागत आहे. यामध्ये समुदायाद्वारे घेतले जाणारे उत्पादन आणि उच्च दर्जाचे कंपोस्टिंग यांचा समावेश होतो. हा कचरा प्रवाह लँडफिल डायव्हर्जन आणि कंपोस्ट उत्पादनासाठी मोठी संधी देतो. खर्च जरी जास्त असला तरी ३०,००० टन कचरा लँडफिल शुल्कावर कौन्सिल दरवर्षी ४.२ दशलक्ष ऑस्ट्रेलियन डॉलर्सपर्यंत बचत करू शकतात. अनेक सोयीसुविधा आणि नवीन प्रकल्प आवश्यक असले तरीही घरातील अन्न वाया जाण्यापासून रोखणे हे सर्वोच्च प्राधान्य असले पाहिजे, परंतु अपरिहार्य अन्न कचऱ्यासाठी ते उच्च गुणवत्तेच्या कंपोस्टमध्ये बदलणे हा योग्य पर्याय आहे.

**- सुजाता बाबर.**

## टुडेज् ब्लॉग

# देश सोडून का जात आहेत?

दरवर्षी जगातील कोट्यधीश लोकांची संख्या वाढत आहे. भारतातही ही संख्या वाढत आहे. भारतातील श्रीमंतांची संख्या दरवर्षी वाढत आहे, इतकेच काय तर जगातील टॉप टेन श्रीमंतात भारतातील गौतम अदानी, मुकेश अंबानी यासारख्या उद्योगपतींचा समावेश आहे, ही भारतासाठी अभिमानाची बाब आहे. देशातील श्रीमंतांची संख्या जशी वाढत आहे तशी देश सोडून परदेशात स्थलांतरित होणाऱ्या श्रीमंतांची संख्या देखील वाढत चालली आहे हे देखील तितकेच खरे आहे. यावर्षी तब्बल सहा हजारांहून अधिक श्रीमंत देश सोडून परदेशात परागंदा झाल्याची आकडेवारी समोर आली आहे.

हेनले प्रायव्हेट वेल्थ मायग्रेशन रिपोर्ट २०२३ मधून ही आकडेवारी समोर आली आहे. जगभरातील संपत्ती आणि गुंतवणूक स्थलांतर यांच्यावर नजर ठेवण्याचे काम हेनलेकडून करण्यात येते. याच संस्थेच्या अहवालातून ही आकडेवारी समोर आली आहे. गतवर्षी ही संख्या साडेसात हजार होती, त्यामानाने यावर्षीची संख्या कमी असली तरी देशातून श्रीमंत का निघून जात आहेत हा प्रश्न पडतो. या देशात जन्मलेले इथेच लहानाचे मोठे झालेले इथेच उद्योगधंदा सुरू करून त्या जोरावर श्रीमंत होणारे उद्योगपती जेंव्हा अतिश्रीमंताच्या श्रेणीत पोहचतात तेंव्हा त्यांना भारतात राहावसे वाटत नाही ही चिंतनीय बाब आहे. 'सारे जहाँ से अच्छा हिंदोस्ता हमारा...' असे एकीकडे म्हणायचे आणि दुसरीकडे आपल्या संपत्तीचा वापर आपल्या देशासाठी करण्याऐवजी परदेशासाठी



करायचा ही मानसिकता श्रीमंतांमध्ये बळावत चालली आहे.

आपल्या देशातून परदेशात स्थायिक होणारे श्रीमंत दुबई, अरब राष्ट्र, सिंगापूर, इंग्लंड आणि अमेरिकेला पसंती देतात. भारतापेक्षाही त्यांना हे देश राहण्यास योग्य का वाटतात याचा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. विशेषतः सरकारने याचा गांभीर्याने विचार करावा. श्रीमंत किंवा अतिश्रीमंत देश सोडून जात आहे यामागचे प्रमुख कारण भारतातील गुंतागुंतीची कररचना हे असल्याचे सांगितले जाते. भारतातील कररचना गुंतागुंतीची आहे, अशी कुरकुर देशातील उद्योगपती करत असतात. इतर देशातील कररचना भारताच्या मानाने सोपी आणि सुटसुटीत आहे तसेच कराबाबतचे नियम देखील लवचीक आहेत, असे नियम आणि लवचिकता आपल्या देशात अवलंबणे गरजेचे आहे. दरवर्षी हजारो श्रीमंत देश सोडून जात आहे हे चित्र आपल्या देशाला भूषणावह नाही. इतक्या मोठ्या प्रमाणात उद्योगपती परदेशात निघून जाणे भारतासारख्या विकसनशील देशाला परवडणारे नाही. कारण ते इथून निघून जात असताना त्यांच्या व्यवसाय क्षमता, रोजगार निर्माण करण्याची संधी, कर उत्पन्न करण्याची क्षमता आणि देशातील संपत्ती घेऊन जात असतात. म्हणून देशातून श्रीमंत, अतिश्रीमंत देश सोडून जाणार नाही याची काळजी सरकारने घ्यावी.

**- श्याम ठाणेदार, पुणे.**

## जन्म हा अखेरचा

# प्राणानुग्रहस्थल - ३



केवळ योगीच शरीरात जेथून प्राण प्रविष्ट झाला तेथून प्राण बाहेर नेऊन शकतो. सामान्य माणसाचा प्राण नवद्वारांपैकी कुठल्याही एका द्वाराने बाहेर जात असतो. मस्तकरंध्राला 'ब्रह्मरंध्र' असे नाव असून ते देहातील दहावे द्वार होय.

**'अष्टचक्र : नवद्वार: देवानां पुरयोध्या ।'** मनुष्यशरीर ही एक अयोध्या नगरी आहे. आठ चक्र असलेले नऊ द्वारांचे देवाचे हे पुर आहे. एका मराठी पदात म्हटले आहे - 'नऊ दरवाजे दहावी खिडकी आत मूर्ती बसविली' देह म्हणजे नऊ द्वारे आणि एक दहावी खिडकी असलेले मंदिर असून त्यात आत्मारामाची प्रतिष्ठापना केलेली आहे. असा या पदाचा अर्थ आहे. ज्ञानेंद्रिये, कर्मेंद्रिये आणि मन-बुद्धी-चित्त-अहंकार या अंत:करण चतुष्ट्यात एकेका देवतेचा निवास असतो, असे वेदांतशास्त्र म्हणते. नेत्र हे इंद्रिये, रुप हा विषय आणि अग्नी ही देवता. अशा प्रकारे प्रत्येक इंद्रियात एकेक देवता मानली आहे. वीरशैवसिद्धांतात प्रत्येक इंद्रियांच्या ठिकाणी एकेका लिंगाचा निवास असतो, असे म्हटले आहे. आचारलिंग, गुरुलिंग, शिवलिंग, जंगमलिंग, प्रसादलिंग ही पंचज्ञानेंद्रियांमधील पाच लिंगे असून मनामध्ये महालिंग असते. इंद्रियांचे नियंत्रण करण्यासाठी सर्व इंद्रियांत भगवान शिव वास्तव्य करतात. परंतु याचा आपल्याला पत्ता नसतो. म्हणून मनुष्यशरीर हे देवांचे नगर आहे. त्याला 'अयोध्या' म्हटले आहे. 'योध्या न भवतीति अयोध्या ।' जेथे युद्ध होत नाही, जेथे परस्परांशी भांडण होत नाही ती 'अयोध्या'. अयोध्या शब्दाचा हा अर्थ असताना 'अयोध्या' हे शहर आज मात्र दुर्दैवाच्या फेऱ्यात सापडून संघर्षाचे केंद्र ठरले आहे.

आपल्या शरीराची 'अयोध्या' करायची असेल तर कुणाशी झगडता कामा नये, कुणाला शब्दाने दुखवू नये, दुसऱ्याला आदराने वागवले पाहिजे तरच तुमचे शरीर 'अयोध्या' होईल. जिथे मत्सर आणि क्रोध नांदतात, तिथे भगवंत नांदत नाही. जेथे सहृदयता आणि प्रेम आहे तेथेच भगवान राहतात. द्वेष करणाऱ्या घरात आणि मनात भगवंत राहत नाही. तो गुणीजनांच्या सहवासात राहतो.

शरीराच्या नवद्वारांपैकी कोणत्या द्वारातून प्राण बाहेर जाईल हे प्रत्येकाच्या कर्मावर अवलंबून असते. शरीरात प्राणाची प्रतिष्ठापना भगवान शिवांनी केली आणि त्याला प्रेरणा देण्यासाठी तेदेखील शरीरात येऊन राहिले. शरीरात प्राण आहे म्हणून शरीराचे चलनवलन चालू असते. शरीरातून प्राण निघून गेला तर ते थांबते. 'मरण' हा शब्द वापरला नाही तरी वस्तुस्थिती लपून राहत नाही. **(क्रमश:) - काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

## जनमानस

### वारीतील सेवाभावी उपक्रम!

जगातील सर्वात मोठा संप्रदाय म्हणून आज वारकरी संप्रदायाचे नाव घेतले जाते. या संप्रदायाचे उगमस्थान म्हणजे आपला महाराष्ट्र. पंढरपूर नगरीत वसलेली या वारकऱ्यांची विठूमाऊली भक्तांच्या ओढीने आसुसलेली असते आणि आषाढी एकादशी जवळ आली की या माऊलीच्या लेकरांनाही तिच्या भेटीची ओढ लागते. खांद्यावर भगवी पताका घेऊन विठूमाउलीची लेकरे पंढरीची वाट धरतात.

आपले घर, शेत, मुलं-बाळं, गुरं-ढोरं सर्व काही माऊलीच्या भरवशावर सोडून तिच्या ओढीने निघालेल्या या लेकरांची काळजीही ही माउली तितक्याच पोटतिडकीने घेत असते. ऊन पावसाची तमा न बाळगता, तहानभूक विसरून माऊलीच्या भेटीसाठी निघालेला विठूभक्त जेव्हा दमतो, थकतो तेव्हा क्षणभर विश्रांतीसाठी थांबतो. अशावेळी त्याला चालण्याचे पुन्हा बळ मिळावे, वेदनांमुळे त्याचा उत्साह कमी होऊ नये म्हणून पितांबरी कंपनीच्यावतीने दरवर्षी वारीमार्गावर वारकऱ्यांच्या पायाला तेल लावून मसाज केले जाते. पितांबरीचे स्वयंसेवक दमलेल्या वारकऱ्यांच्या पायांना पितांबरीचेच उत्पादन असलेले क्युअर ऑन वेदनाशामक तेल लावून मसाज करताना आजही तुम्हाला ठिकठिकाणी दिसतील. वयोवृद्ध वारकऱ्यांना हे स्वयंसेवक आपणहून आधार देऊन बसवतात, त्यांची मायेने विचारपूस करतात, त्यांच्या पायांना तेल लावून त्यांची सेवा करतात. प्रत्यक्ष पांडुरंगानेच त्यांना सेवेला पाठवले असल्याचा भाव यावेळी वयोवृद्धांच्या चेहऱ्यावर पाहायला मिळतो. उद्योगासोबतच सामाजिक बांधिलकी जपणारे कंपनीचे मालक रवींद्र प्रभुदेसाई यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या उपक्रमाचा दरवर्षी हजारो वारकरी लाभ घेत असतात. राज्यातील अन्य उद्योजकांनीही त्यांचा आदर्श घ्यायला हवा !

**- जगन घाणेकर, मुंबई.**

### श्रद्धाळू महाराष्ट्र

पंढरीची वारी म्हणजे केवळ वारकऱ्यांचाच नव्हे, तर राज्यातील तमाम सश्रद्ध भाविकांचा महाउत्सव. त्यामुळेच आषाढीची वारी आज गिनीज बुकात नोंदली गेली आहे. व्यावहारिक कामे बाजूला सारून केवळ भगवंताच्या मुखदर्शनासाठी वारकरी पायपीट करत निघतो. यावेळी तब्येतीची चिंता, खाण्या-पिण्याची व्यवस्था, घरच्या पोराबाळांची काळजी सारे काही त्या पांडुरंगावर सोडून वारकरी भगवी पताका घेऊन पंढरीची वाट धरतो आणि तो भक्ताच्या भक्तीच्या भुकेला आसुसलेला पांडुरंगही आपल्या भक्ताची सर्वार्थाने काळजी वाहतो. देशविदेशातील पर्यटक यावेळी मुंबईनगरीत ठाण मांडून असतात. अशा श्रद्धाळू भक्तांच्या महाराष्ट्राचा आपण एक अविभाज्य घटक आहोत याचा महाराष्ट्रातील प्रत्येक नागरिकाने अभिमान बाळगला पाहिजे.

**- मोक्षदा घाणेकर, काळाचौकी.**

# फसलेला प्रयोग - आदिपुरुष

एखादी गोष्ट जर तुम्हाला गेल्या शेकडो वर्षांपासून माहिती असेल आणि त्या गोष्टीमध्ये बदल करून तुम्हाला ती पुन्हा सांगितल्यास तुम्हाला ती आवडेल का, समजा जे बदल चालू घडामोडींशी सुसंगत असल्यास एकवेळ आपण समजून घेऊ शकतो, पण अनेकदा काही वेगळी मांडणी करायची म्हणून किंवा लक्ष वेधून घ्यायचे म्हणून करायला गेल्यास जे हसं होतं ना ते प्रसिद्ध दिग्दर्शक ओम राऊत दिग्दर्शित 'आदिपुरुष'चे झाले आहे.

'रामायण' ही अशी गोष्ट आहे जी प्रत्येकाला माहिती आहे. निदान त्यातील काही मूळ गोष्टी तर कित्येकांच्या मनात घर करून आहेत. कोण कुणाचे कोण, त्यांची भूमिका काय, कोण शत्रू, कुणी काय केले, कसे केले, कुणी कुणाचा बदला घेतला याबद्दल काही वेगळं सांगण्याची गरज नाही. निदान रामायणाबाबतही तुम्ही काही लिबर्टी घेण्याचा विचार करू नये. नाहीतर वेगवेगळ्या वादाला सामोरं जाण्याची शक्यताच अधिक आहे. गेल्या दोन वर्षांहून अधिक काळ ज्या चित्रपटाची प्रेक्षक आतुरतेनं वाट पाहत होते तो 'आदिपुरुष' आता थिएटरमध्ये प्रदर्शित झाला आहे. 'कावळ्याच्या हाती दिला कारभार अन् त्याने घाण करून सोडला दरबार'. 'आदिपुरुष' पाहून झाल्यावर कदाचित हीच भावना आपल्या मनात येऊ शकते.

याचा अर्थ या चित्रपटाच्या निर्मात्यांना कावळ्याची उपमा देऊन त्यांच्या कुवतीवर प्रश्नचिन्ह उभं करायचा अजिबात हेतू नाही. या चित्रपटाचे निर्माते, दिग्दर्शक हे उत्तम अन् सुजाण कलाकार आहेत यात काहीच शंका नाही. त्यांची बरीच कामं आपण याआधी पाहिली आहेत, पण 'रामायण'सारख्या महाकाव्याला न्याय देण्यासाठी ही मंडळी समर्थ नसल्याने ही म्हण वापरावी लागत आहे. बघायला गेलं तर ओम राऊतकडे एक खूप मोठी संधी होती. या चित्रपटाचं अभूतपूर्व असं सादरीकरण करून रामानंद सागर यांच्याप्रमाणे आपलं नाव इतिहासात कोरून ठेवण्याची ताकद त्यात होती, पण या संधीचा योग्य वापर न केल्यानेच या चित्रपटाच्या निर्मात्यांवर ही वेळ आली आहे असं मला वाटतं.

ओम राऊत यांच्या यापूर्वीच्या 'तान्हाजी'वरील चित्रपटाला प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळाला होता. त्यांच्या 'लोकमान्य टिळक' यांच्या आयुष्यावरील चित्रपटाचे प्रेक्षकांनी कौतुक केले होते. त्यामुळे रामायणावर आधारित चित्रपटाचे त्यानं जे शिवधनुष्य पेलले त्यात तो यशस्वी होईल असे अनेकांना वाटले होते, मात्र या चित्रपटानं बऱ्याच अंशी निराशा केली आहे हे ठामपणे म्हणावे लागेल. त्याला कारण दिग्दर्शकानं आपण जे रामायण लोकांना माहिती आहे ते न दाखवता त्याचे वेगळ्या प्रकारे सादरीकरण करीत आहोत, असे म्हणत जे काही पडद्यावर आणले आहे ते पाहून हसावं की रडावं हे कळत नाही. प्रभास, सैफ अली खान, क्रिती सेनॉन, देवदत्त नागेसारखी तगडी स्टारकास्ट 'आदिपुरुष'मध्ये असून हा चित्रपट



ज्या तीव्रतेनं लक्षवेधक व्हायला हवा होता तेवढा तो झाला नाही. मोशन पिक्चरसारख्या वेगळ्या तंत्रज्ञानावर आधारित चित्रीत झालेला हा चित्रपट तीन तास आपले मनोरंजन करण्याचा जो प्रयत्न करतो तो केविलवाणा म्हणावा लागेल. कारण सुरुवातीची पहिली ३० मिनिटं 'आदिपुरुष' जो वातावरण निर्मिती करतो ती कौतुकास्पद आहे, मात्र त्यानंतर जे सुरू होतं ते कमालीचं कंटाळवाणं आहे. चित्रपटाची सुरुवातच रावणाला ब्रह्मदेवाकडून मिळालेल्या वरदानापासून होते. प्रभू श्रीराम आपली पत्नी सीता अन् भाऊ लक्ष्मणासह अयोध्या सोडून वनवासाला निघतात इथवरची गोष्ट तर चित्रपटाच्या सुरुवातीच्या टायटल्समध्ये आटोपण्यात आली आहे.

दिग्दर्शकानं सुरुवातीला जी श्रेयनामावली येते त्यामध्येच रामायणाची सुरुवात, राजा दशरथ, त्याच्या राण्या, अयोध्या, राम, रामाचा जन्म आणि त्याचा वनवास याविषयी सांगून टाकले आहे. त्यानंतर दिग्दर्शक थेट बर्फाळ प्रदेशात बसलेल्या रावणाकडे येतो. तिथे त्याला ब्रह्मदेव अमरत्वाचे वरदान देतात, मात्र त्यात एक अट सांगून जातात. त्याचे मरण कुठे, केव्हा आणि कुणाच्या हातून होणार याची भविष्यवाणी करतात. अर्थात ही सगळी स्टोरी प्रेक्षकांना माहिती आहे. यात नवीन काही नाही, मात्र दिग्दर्शक सातत्यानं जे सांगत होता की मांडणी, सादरीकरण वेगळे आहे की, ते प्रेक्षकांच्या डोक्यावरून जाते.

इंद्रजीत जेव्हा हनुमानाच्या शेपटीला आग लावतो तेव्हा त्यांच्यातील डबल मीनिंग डायलॉगबाजी ऐकून तर काही क्षण फरहाद सामजीचा चित्रपट सुरू आहे का असा भास होतो. मनोज मुंतशीरसारख्या जाणकार व्यक्तीने जर हे संवाद लिहिले असतील तर यावर काही न बोललेलंच बरं. संगीत, पार्श्वसंगीत यथातथाच आहे. 'जय श्रीराम' हे गाणं सोडलं तर बाकी कोणतीही गाणी लक्षात ठेवण्यासारखी नाहीत. ज्यांनी हॉलीवूडचे काही ॲनिमेशनपट पाहिले असतील, त्यांना आपण अजूनही व्हीएफएक्स आणि ग्राफीक्स यात किती मागे आहोत हे दिसून येईल.

५०० कोटींचे बजेट असणाऱ्या या चित्रपटाचा प्रामुख्यानं भर हा ग्राफीक्सवरच होता, मात्र तो फारसा प्रभावी नाही हे नमूद करावे लागेल. बराच काळ पडद्यावर असलेला अंधार, त्यात तो निरस असा थ्रीडी इफेक्ट निराशेत आणखी भर टाकतो. काही प्रसंग प्रभावी झाले आहेत, मात्र ते बोटावर मोजावे इतकेच आहेत. प्लॅनेट ऑफ्स, गोरिला, किंग कॉंगसारखे चित्रपट ज्यांनी पाहिले असतील त्यांना यात काही नवीन वाटणार नाही. तीन तासांचा 'आदिपुरुष' काही वेळानं कमालीचा रटाळवाणा वाटू लागतो. रामाची भूमिका करणारा प्रभास हाच मुळी इतका हतबल झालेला वाटतो की राम एवढा अगतिक कसा असू शकतो, असा प्रश्न पडल्याशिवाय राहत नाही.

'जय श्रीराम, जय श्रीराम राजाराम' नावाचे गाणे प्रभावी आहे. याशिवाय पार्श्वसंगीतदेखील लक्ष वेधून घेणारे आहे. यापूर्वी सोशल मीडियावरदेखील अजय-अतुल यांच्या गाण्यांना मिळालेला प्रतिसाद मोठा होता. 'आदिपुरुष'मधील गाणी चाहत्यांच्या पसंतीस पडली आहेत. 'आदिपुरुष' हा रामायणासारख्या महाकाव्यातील केवळ काही निवडक प्रसंग घेऊन प्रेक्षकांची निराशा करणारा चित्रपट आहे आणि त्याकडे त्याच दृष्टिकोनातून पाहिलं तरच बरं. तुम्ही जर फार अपेक्षा ठेवून 'आदिपुरुष'ला जात असाल तर तसं करू नका. याचे कारण तुम्हाला मोठ्या निराशेला सामोरं जावं लागेल. तंत्रज्ञानाच्या माध्यमातून नव्या युगातील रामायण कसे असू शकते किंवा त्याचे सादरीकरण कशा प्रकारे केले जाऊ शकते याचा प्रयत्न दिग्दर्शक ओम राऊतनं केला आहे, पण हा प्रयत्न काही अंशी फसला आहे.

**- आशिष निनगुरकर.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.



## झेडपी आंतरजिल्हा पदस्थापनेसाठी शिक्षकांचा ठिय्या

**सोलापूर :** झेडपी आंतरजिल्हा शिक्षकांची पदस्थापनेसाठी गेल्या दोन महीन्या पासून९३ शिक्षकांची भटकंती सुरू आहे. तरीसुध्दा शिक्षणाधिकारी आणि प्रशासन या गोष्टीकडे दाद देण्यास तयार नाहीत. अशी प्रतिक्रिया इथे बसलेल्या शिक्षकांनी दिल्या. सोलापूर जिल्ह्य शिक्षक संघटनेच्या वतीने या संदर्भात आमरण उपोषणाचा इशारा देण्यात आला आहे. याबाबत विरभद्र यादवाड बोलताना म्हणाले की झेडपीकडे दीड दोन महिन्यापूर्वी आंतरजिल्हा बदलीने ९४ शिक्षक रुजू झालेले आहेत. २११ समाजशास्त्र विषय शिक्षकांनी नकार दिलेले आहेत तर दुसरींकडे ४८ शाळेवर एकही शिक्षक नाही. १९४ शाळेवर एक-एकच शिक्षक आहेत. याशिवाय ५०० हून अधिक ठिकाणी उपशिक्षकांची रिक्त पदे आहेत. हा विरोधाभास लक्षात घेता आंतरजिल्हा बदलीने आलेल्या शिक्षकांना तात्काळ पदस्थापना देणे गरजेचे आहे. परंतु ते अद्याप शिक्षणाधिकारी आणि जिल्हा प्रशासन यांच्याकडून जाणीवपूर्वक केले जात नाही असा आरोप वीरभद्र यादवाड यांनी केला. आंतरजिल्हा बदलीने जिल्ह्यात आलेल्या शिक्षकांना येत्या दोन-तीन दिवसात पदर स्थापना देण्यात येणार असल्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्यासाठी समुपदेशन घेण्यात येणार आहे. तसेच पदस्थापना देत असताना प्रथम शून्य शिक्षक असणाऱ्या शाळांचा विचार करण्यात येणार आहे. त्या पध्दतीने शिक्षकांना पदस्थापना देण्यात येईल, असे प्रशासन अधिकारी इशादीन शेळकंदे यांनी सांगितले.

## अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या कार्यकारिणीत महेश निकंबे यांची वर्णी



**सोलापूर :** मराठी रंगभूमीवरील सहभाग आणि नृत्य क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन अखिल भारतीय मराठी नाट्या परिषदेच्या उपनगरीय शाखेच्या कार्यकारिणीत नृत्य परिषदेचे शहर व जिल्हाध्यक्ष महेश निकंबे यांची निवड करण्यात आली आहे. स्वीकृत सदस्य म्हणून त्यांची वर्णी लागली आहे. शाखेचे अध्यक्ष विजय साळुंके यांनी नियुक्ती पत्र महेश निकंबे यांना देऊन शुभेच्छा दिल्या. तसेच प्रमुख कार्यवाह प्रशांत शिंगे यांनी अभिनंदन केले.सोलापुरात कलाकारांना व्यासपीठ देत शेकडो नाट्य प्रयोग गाजवणाऱ्या नाट्य प्रेमींचे हक्काच स्थान असणारे अखिल भारतीय मराठी नाट्या परिषदेच्या उपनगरीय शाखेच्या कार्यकारिणीत सहभागी होऊन काम करण्याची संधी मिळाल्याबद्दल महेश निकंबे यांनी आनंद व्यक्त सर्वाचे आभार मानले.

## राष्ट्रवादी पदवीधर सेलच्या प्रदेश सरचिटणीस पदी सुग्रीव कोळी



**पंढरपूर :** पटवर्धन कुरोली ता पंढरपूर येथील सुग्रीव कोळी यांची राष्ट्रवादी पदवीधर सेलच्या प्रदेश सरचिटणीस पदी प्रदेशाध्यक्ष पाटील व पदवीधर सेलचे प्रदेशाध्यक्ष डॉ नरेंद्र काळे यांनी केली आहे. सोलापूर जिल्ह्यातून पदवीधर सेलच्या प्रदेश कार्यकारिणीवर त्यांची एकमेव निवड झाली आहे. सुग्रीव कोळी यांनी यापूर्वी राष्ट्रवादी पदवीधर सेलच्या सोलापूर जिल्हाध्यक्ष म्हणून काम केले आहे. शिवाय ते विधार्थी दशेपासून राष्ट्रवादी पक्षाशी निगडित असून पदवीधर आ आरून लाड यांच्या विजयासाठी महत्वाची भूमिका बजावीली होती. त्यांच्या कामाची दखल घेऊन प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील व डॉ नरेंद्र काळे यांनी त्यांना प्रदेश पातळीवर काम करण्याची संधी दिली आहे. त्यांच्या निवडी नंतर विरोधी पक्षनेते आजित पवार, खा सुप्रिया सुळे, जिल्हध्यक्ष बळीराम साठे, जिल्हाकार्याध्यक्ष उमेश पाटील, आ. बबनदादा शिंदे, आ. संज्यमामा शिंदे, आ. यशवंत माने, दीपक साळुंखे, उत्तम जानकर, भागीरथ भालके, कल्याणरावं काळे, अभिजित पाटील, गणेश पाटील, श्रीकांत शिंदे, आदींनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

## भावाचा खून; भाऊ आणि भावजयेस जामीन मंजूर

**सोलापूर :** भांड्याचे भाडे देण्याच्या कारणावरून सैफन गुडुभाई नदाफ यांचा खुन केल्याप्रकरणी अटकेत असलेला त्याचा भाऊ मिरालाल गुडुभाई नदाफ आणि त्याची पत्नी झामतबी नदाफ (दोघे रा.पिंजारवाडी, ता. दक्षिण सोलापूर) यांना जिल्हासत्र न्यायाधीश आर.एन. पांढरे यांनी जामीन मंजूर केला. दि. २८ आगस्ट २०२२ रोजी सकाळच्या सुमारास मयत सैफन हा शेतातील डी.पी. चेक करणेसाठी गेला होता. त्यावेळी आईच्या वर्षश्राध्दासाठी आणलेल्या भांड्यांचे भाडे देण्याच्या कारणावरून मयत सैफन व त्याचा भाऊ मिरालाल याचेत भांडण सुरु झाले. त्यावेळी लाथाबुक्याने झालेल्या मारहाणीत सैफन हे मयत झाले होते. मयताची पत्नी शैनाजबी नदाफ यांच्या फिर्यादीवरून वळसंग पोलिसांनी दोघांवर खुनाचा गुन्हा दाखल करून अटक केली होती. या प्रकरणात आरोपींतर्फे ॲड.मिलिंद थोबडे, ॲड. सलीम नदाफ, ॲड.विनोद सूर्यवंशी यांनी तर सरकारतर्फे ॲड. अल्पना कुलकर्णी यांनी काम पाहिले.

**महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ औरंगाबाद**
**पानचक्की, औरंगाबाद ४३१००२**
Tele-fax: 0240-2401584/2402366
Website : www.mahawakf.com Email: ceomsbw@gmail.com

संचिका क्र. ६९-३४८-२०२१
क्र. मरावंम/चौकशी-११७९/७६९८/२०२२
दिनांक : ११ ऑक्टो. २०२२

**नमूना अ यू**
(नियम ३७ (१) पहा)
**(जाहीर नोटीस)**

**प्रकरण :** वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अन्वये वक्फ संस्थेच्या योग्य प्रशासनाकरीता योजना मंजूर करण्याच्या अनुषंगाने नोटीस

वक्फ संस्था_Masjid Peer Ladle Waqf, At. Mangalweda, Village. Mangalweda, Tq. Mangalweda, Dist. Solapur

ज्याअर्थी, वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३२ अन्वये राज्य वक्फ मंडळाला राज्यातील वक्फ संस्थेचे प्रशासन करण्याकरिता वक्फ संस्थेची योजना वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अन्वये मंजूर करण्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत.

ज्याअर्थी, वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३६/४३ अन्वये Masjid Peer Ladle Waqf, At. Mangalweda, Village. Mangalweda, Tq. Mangalweda, Dist. Solapur. ही संस्था नोंदणीकृत असून या संस्थेचा नोंदणी क्रं. MSBW/SLR/415/2021 असा आहे, आणि

ज्याअर्थी Mr. Saleem Chandulal Mujawar & Ors, Add. At. Mangalweda, Tq. Mangalweda, Dist. Solapur यांनी दिनांक. ३०.०८.२०२१ रोजीच्या अर्जान्वये सदर संस्थेच्या हितासाठी व या वक्फ संस्थेच्या सूयोग्य व्यवस्थापनाकरीता वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अन्वये महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडे योजना सादर केली आहे.

त्याअर्थी, महाराष्ट्र राज्य वक्फ नियम २०२२ मधील नियम क्रं. ३७ (१) अन्वये सदर वक्फ संस्थेच्या व्यवस्थापनासाठी योजना मंजूर करण्याचा प्रस्ताव विचारात घेताना या वक्फ संस्थेच्या योजनेविषयी गैरअर्जदार यांच्या काही तक्रारी, आक्षेप असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या आत, मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पानचक्की, औरंगाबाद यांच्याकडे आपले म्हणणे दाखल करावे, असे सुचित करण्यात येत आहे.

सही/-
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद**

# पंढरपूरकर करणार वारीत





# अब की बार नो शिंदे-फडणवीस सरकार

## पंढरपूर बचाव समिती तसेच संत भूमी बचाव समितीच्या पदाधिकाऱ्यांचा इशारा

सुराज्य/सोलापूर

**ऐकीकडे पंढरीत होणाऱ्या प्रस्तावित कॉरिडॉरबाबत शासन व प्रशासन कोणतीही माहिती स्थानिकांना देत नाही. तर दुसरीकडे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मात्र सोलापूर येथे २७०० कोटी रूपयांचा आराखडा करणार असल्याचे जाहीर केले आहे. या सर्व प्रक्रीया स्थानिकांना टाळून होत असून आम्हाला विश्वासात न घेतल्यास यंदा वारीमध्ये येणाऱ्या लाखो वारकऱ्यांना अब की बार नो शिंदे-फडणवीस सरकार अशी हात जोडून विनंती करणार असल्याचा इशारा तीर्थक्षेत्र पंढरपूर बचाव समिती तसेच संत भूमी बचाव समितीच्या पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.**

२९ जून रोजी आषाढी एकादशी असून यासाठी येणारे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे कॉरिडॉरच्या कामाचे भूमिपूजन करणार असल्याची चर्चा सुरू आहे. या पार्श्वभूमिवर कॉरिडॉरला विरोध करणाऱ्या संघटनाच्या पदाधिकाऱ्यांनी बैठक घेतली. यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी संघटनेचे प्रवक्ते रामकृष्ण महाराज वीर, माजी नगरसेवक आदित्य फत्तेपूरकर, नाना कवठेकर, शैलेश बडवे, ऋषिकेश उत्पात, भागवत बडवे, श्रीकांत हरिदास, राजेश नलबिलवार, बबनराव बिडवे, भिंगे आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना वीर महाराज यांनी, प्रस्तावित कॉरिडॉर कसा असावा याचा आम्ही आराखडा तयार करून प्रशासनास सादर केला आहे. मात्र यानंतर प्रशासनाकडून आमच्याशी कोणत्याही प्रकारचा संपर्क साधण्यात आला नाही. मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री हे वारंवार स्थानिकांचे समाधान होईल तसेच कोणावरही अन्याय करून आराखडा राबविणार नसल्याचे जाहीर करीत आहेत. परंतु याबाबत स्थानिकांना विश्वासात देखील घेतले जात नसून कोणतीही माहिती दिली जात नसल्याने नाराजी व्यक्त केली.



आराखड्याबाबत चर्चा करण्यासाठी मुख्यमंत्री शिंदे व उपमुख्यमंत्री इ् फडणवीस यांची अनेकदा वेळ मागितली आहे मात्र याला देखील प्रतिसाद मिळत नसल्याचे सांगितले. विविध मार्गाने व प्रसिध्द होणाऱ्या बातमीनुसार कॉरिडॉरबाबत सात आराखडे तयार करण्यात आल्याची माहिती कानावर येत आहे. तसेच मुख्यमंत्र्यांच्या हस्ते याचे आषाढीमध्ये भूमिपूजन देखील होणार असल्याचे समजते. यासर्व शंका किंवा कॉरिडॉर का बाबत कोणता निर्णय घेतला आहे हे विश्वासात घेऊन सांगणे गरजेचे आहे. अन्यथा आषाढी वारीसाठी येणाऱ्या दहा लाख भाविकांना आम्ही अब की बार नो शिंदे-फडणवीस सरकार अशी हात जोडून विनंती करणार असल्याचा इशारा वीर महाराज यांनी दिला.

आषाढी हा समस्त वारकरी संप्रदायाचा आनंदा सोहळा असतो तर मुख्यमंत्री हे तमाम राज्याच्या वतीने येथे विठुरायाची महापूजा करण्यासाठी येतात. यामुळे आम्ही त्यांना येण्यासाठी विरोध करणार नाही. परंतु मंदिर परिसरातील प्रत्येक दुकानात, घरात अब की बार नो शिंदे- फडणवीस सरकार असे काळे फलक लावणार असल्याचे वीर _महाराज यांनी सांगितले.

## महिलेचे मंगळसुत्र हिसकावले

**सोलापूर :** प्रियांका चौकाकडे जाणाऱ्या रोडवरील जातकर वस्ती दाल मिल जवळ पायी चालत जात असताना एका अनोळखी इसमाने दुचाकीवर येऊन फिर्यादी अंबिका रवि पुजारी (वय-२७, रा. धोतरेकर वस्ती) यांच्या गळ्यातील ४० हजार रूपये किमतीचे मंळसुत्र जबरदस्तीने खेचून चोरून नेले आहे.

ही घटना दि.१९ जून रोजी दीड वाजण्याच्या सुमारास घडली. याप्रकरणी अंबिका पुजारी यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्यादी दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरुन अनोळखी इसमाविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा पुढील तपास सपोनि पवार हे करित आहेत.

### सुरत-चेन्नई एक्सप्रेस महामार्ग विषय पुन्हा चिघळला

# तुळजापूर-सोलापूर रस्त्यांवर शेतकऱ्यांचा चक्का जाम

सुराज्य/सोलापूर

सुरत-चेन्नई ग्रीनफिल्ड आणि रिंगरोड हायवेवरील बाधित शेतकऱ्यांना वाढीव पाच पट्ट मोबदला मिळावा, यामागणी साठी शेतकरी पुन्हा आक्रमक झाले. सोमवारी सकाळी रयत क्रांती रिंग रोड संघर्ष समितीच्या वतीने सोलापूर- तुळजापूर राष्ट्रीय महामार्गावरील उळगाव येथे रास्ता रोको आंदोलन करत चक्का जाम आंदोलन केले.

यापूर्वी अक्कलकोट तालुक्यात देखील कंपनीच्या वतीने मोजणीसाठी आलेल्या कर्मचाऱ्यांना पळवून लावण्यात आले होते. मुख्यमंत्र्यासमवेत बैठक होऊन वाढीव मोबदला संदर्भात ठोस निर्णय झाला नसल्याने सुरत -चेन्नई एक्सप्रेस महामार्ग विषय पुन्हा चिघळण्याची शक्यता आहे.



सुरत-चेन्नई महामार्ग आणि सोलापूर रिंगरोड या राष्ट्रीय महामार्गासाठी संपादीत जमिनीला देण्यात येणाऱ्या मोबदला कमी आहे. वाढीव मोबदाला आणि पाच पट्ट भाव द्यावा, अशी मागणी सोलापूर जिल्ह्यातील बार्शी, अक्कलकोट व दक्षिण सोलापूर या बाधित शेतकऱ्यांची आहे. प्रशासनाकडून मोजणीचे आणि जमीन ताब्यात घेण्याचे काम चालू आहे. या संदर्भात दोन दिवसापूर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली मात्र प्रथम त्या भागातील रेडी रेकनर दर जिल्हाधिकाऱ्यांना फिक्स करा असे आदेश दिले. पण याबाबत कोणतीही ठोस भुमिका घेतली गेली नाही. त्यामुळे दीपक भोसले यांच्या नेतृत्वाखाली रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनात अमोल वेदपाठक, शिवानंद सावळगी,परमेश्वर गाढवे, महेश भोज, विक्रम गाढवे, श्रीशैल भोज, सचिदानंद चौगुले, हरी चौगुले, चंद्रकांत चव्हाण, काशिनाथ गाढवे, चंद्रकला वेदपाठक, तनुजा मुळे, शांताबाई गाढवे, यशपाल वाडकर, भिवा शिंदे, उषाबाई गाढवे, यशोदा शिंदे आदीसह शेतकरी सहभागी झाले होते.

## वाळू निविदा प्रक्रियेसाठी दोन दिवसाची वाट पाहावी लागणार

सुराज्य/सोलापूर

नव्या वाळू धोरणानुसार नागरिकांना सहाशे रुपये ब्रासनने वाळू देण्यात येणार असे महसूल मंत्र्यांनी जाहीर करून तीन महिने उलटले तरी अद्याप नव्या धोरणानुसार वाळू विक्री सुरू झालेली नाही. जिल्ह्यातील सहा ठिकाणी वाळू घाट निश्चित करण्यात आले असून या ठिकाणाहून वाळू विक्री सुरू करण्यात येणार आहे. वाळू उपसा करून देण्यासाठी काढण्यात आलेल्या निवेदा प्रक्रियेला वेळोवेळी देण्यात आलेल्या मुदतवाढीमुळे निविधा प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी आणखी दोन दिवसांची प्रतीक्षा करावी लागणार आहे.

जिल्ह्यातील पंढरपूर, मंगळवेढा व माळशिरस तालुक्यातील चळे, उचेठाण, जांभुड, उंबरे, वाफेगाव व गुरसाळे याठिकाणी वाळू घाट निश्चत करण्यात आले आहेत.सोमवारी वाळुघाटांना बोली लावणेत आली होती. गुरसाळे,(ता. पंढरपूर) येथील वाळुघाटास एकच बोली लावल्याने२६ तारखे पर्यंत निविदेस मुदतवाढ देणेत आली आहे. इतर पाच ठिकाणच्या निविदाधारकांची तांत्रिक तपासणी केल्यानंतर पुढील २ दिवसात अंतिम कार्यवाही करणेत येणार असल्याची माहिती उपजिल्हाधिकारी विठ्ठल उदमेले यांनी दिली.

**॥ मोफत प्रवेश ॥**

**वसतिगृहात प्रवेश देणे चालू आहे.**

**श्री काशिविश्वेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ जेऊर, ता.अक्कलकोट संचलित**

**श्री काशिविश्वेश्वर विद्यार्थी वसतिगृह, जेऊर, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर**

**"शाळा व वसतिगृह प्रवेश सन २०२३-२४"**

आमच्या येथे इ. ५ वी ते १० वी मराठी व कन्नड शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मोफत प्रवेश दिला जाईल.

ठळक वैशिष्ट्ये :- १) इ. ५ वी ते १० वी कन्नड व मराठी माध्यमचे विद्यार्थ्यांना मोफत प्रवेश २) सेमी इंग्लिश : सोय इ.५ वी ते १० वी मराठी व कन्नड माध्यम ३) संगणक प्रशिक्षणाची सोय. ४) सुंदर, हवेशीर सर्व सोयीयुक्त भव्य इमारत ५) भोजनाची व राहण्याची उत्तम सोय. ६) खेळासाठी भव्य क्रीडांगण व साहित्य उपलब्ध. ७) विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक विकासाकडे व प्रगतीसाठी विशेष लक्ष. ८) शासनाच्या नियमानुसार सर्व सवलती उपलब्ध. ९) विद्यार्थ्यांना ताट, वाटी, गादी, ग्लास, ब्लँकेट, सतरंजी, कपाट व इतर साहित्य मिळेल. १०) पिण्याच्या पाणीसाठी फिल्टरची सोय व शौचालय, स्नानगृहची उत्तम सोय.

संपर्क
अधीक्षक
श्री.कळवंत सर 9421067053 | श्री.पांढरे पी.आर. 9011634507 | श्री.आदरशेट्टी के.आय. 8379897116

॥ ग्रामदैवत ॥
॥ श्री रामलिंगेश्वर ॥

**प्रवेश! प्रवेश!! प्रवेश!!!**
॥ श्री सिध्दरामाय नमः ॥ ॥ तमसो मां ज्योतिर्गमय ॥
श्री रामलिंगेश्वर समाज सेवा मंडळ, संचालित
**श्री रामलिंगेश्वर प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय**
महालक्ष्मी नगर, तीर्थ-चप्पळगांव रोड श्रीक्षेत्र तीर्थ, ता.द.सोलापूर, जि.सोलापूर - ४१३२२८

संस्थापक अध्यक्ष




प्रा.डॉ.भीमाशंकर श. बिराजदार (सर)

**इ.५ वी ते १२ वी प्रवेश सुरु**

मुला-मुलींसाठी खास शिक्षणाची सोय | अनुभवी प्राध्यापक वर्ग | १०० टक्के निकालाची परंपरा | जाणे येण्यासाठी वाहनाची सोय

**इयत्ता ५ वी ते १२ वी मध्ये प्रवेश सुरु इयत्ता ११ वी, १२ वी कला (Arts) वाणिज्य (Commerce) प्रवेश सुरु**



**वसतिगृहाची वैशिष्ट्ये**
- मोफत जेवणाची सोय
- निसर्गरम्य वातावरण
- प्रशस्त इमारत
- अभ्यासासाठी स्वतंत्र वर्ग
- पिण्यासाठी शुद्ध पाणी
- आरोग्य तपासणी
- २४ तास लाईटची सोय
- स्वच्छ परिसर
- सुसज्ज ग्रंथालय
- प्रशस्त क्रिडांगण

**श्री महालक्ष्मी विद्यार्थी मुलांचे वसतिगृह मोफत प्रवेश सुरु**
श्रीक्षेत्र तीर्थ, ता.द.सोलापूर, जि.सोलापूर - ४१३२२८
संपर्क : श्री.अजित पट्टणशेट्टी (सर) अधिक्षक : 9325211653
श्री.सिध्देश्वर घोंगडे (सर) सहाय्यक : 9119400565

॥ ज्ञानगंगा घरोघरी ॥
ज्ञानगंगा घरोघरी
**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक**
अभ्यास केंद्र (६५१२३)
श्री.पट्टणशेट्टी (सर) केंद्र संयोजक : 9763964052
श्री.सिध्देश्वर घोंगडे (सर) सहाय्यक : 9119400565

**१२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी प्रवेश सुरु**
BA.B.Com प्रवेश सुरु | पोलीस भरतीसाठी शासन मान्यता | महिलांना शिक्षण घेता येते
परीक्षा केंद्र उपलब्ध | प्रत्येक रविवारी मार्गदर्शन | १८ वय वर्षे पुर्ण असणे आवश्यक
तज्ञ प्राध्यापक वर्ग | नोकरी व व्यवसाय करुन पदवी घेऊ शकता | सरकारी नोकरदारांना सुवर्णसंधी (बढतीसाठी)

**※ अधिक माहितीसाठी संपर्क ※**
**श्री.सोनकवडे, सर (प्राचार्य) मो.9527952200**
श्री.पाटील एन.पी. मो.8668293412 | श्री.गुजा सर, मो.9421044240
श्री.बगले सर, मो.9860079169 | श्री.पट्टणशेट्टी सर, मो.9763900552
श्री.बिराजदार सर, मो.9850561739

**श्री रामलिंगेश्वर सार्वजनिक वाचनालय,** श्री क्षेत्र तीर्थ, ता.द.सोलापूर

संस्था. अध्यक्ष: प्रा.डॉ.भीमाशंकर श.बिराजदार सर | संस्था उपाध्यक्ष: श्री.रामचंद्र रे.दसले

संपर्कसाठी वेळ सकाळी १० ते संध्या.५ पर्यंत



टीप : यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ परीक्षा केंद्र उपलब्ध इ.५ वी ते १२ वी च्या विद्यार्थ्यांना वसतिगृहात मोफत प्रवेश

# दुधाला देशी दारूच्या क्वॉर्टर एवढी तरी किंमत द्या

## सदाभाऊ खोत यांची उद्विग्न मागणी

## दूध दरप्रश्नी सरकारने बोलविली २२ जुलैला बैठक ; उत्पादन खर्च ३५ रूपयांवर

सुराज्य/सोलापूर

**देशी दारूच्या क्वॉर्टर एवढी किंमत तरी एक लिटर दुधाला द्या असे उद्विग्न होत माजी मंत्री आणि रयत क्रांती संघटनेचे नेते सदाभाऊ खोत यांनी राज्य सरकारकडे केली आहे. दुधाला भावच नसल्याने शेतकऱ्यांचे हाल होत आहे. त्यामुळे सदाभाऊ खोत प्रचंड नाराज झाले आहेत.**

विदेशी दारूच्या एका बाटलीची जेवढी किंमत आहे, तेवढे पैसे आम्हाला नकोत. पण देशी दारूच्या एका क्वॉर्टरसाठी जेवढे पैसे लागतात तेवढी किंमत एक लिटर दुधाला द्यावी, अशी मागणी सदाभाऊ खोत यांनी केली आहे.

यावेळी त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना इशाराही दिला आहे. ते इंदापूर येथील मेळाव्यासाठी आले असता दै.सुराज्य शी बोलत होते.

उत्पादन खर्चापेक्षा कमी किमतीला शेतकऱ्यांना दुध विकावे लागत आहे. पशुखाद्य, चाऱ्याचे वाढलेले दर यामुळे दुधधंदा परवडत नसतानाही शेतकरी तो व्यवसाय करीत आहे. परंतु सहकारी व खाजगी दूध संघाच्या मनमानी कारभारला सरकार कडून लगाम घालणे गरजेचे असताना सरकार केवळ बघ्याची भुमिका बजावत असल्याने शेतकऱ्यांतून प्रचंड नाराजी पसरली असून सदाभाऊ खोत यांनी ही उद्विग्न मागणी करत राज्य सरकारला इशाराही दिला आहे. पशुसंवर्धन व दुग्ध विकास मंत्र्यांनी दुध दरा संदर्भात गुरुवारी दि.२२ जुलै रोजी राज्यातील प्रमुख खाजगी व सहकारी दुध उत्पादक संघ व पशुखाद्य उत्पादक संस्थासोबत चर्चा करण्यासाठी विधान भवन पुणे येथे बैठक बोलविली आहे.या बैठकीत आम्ही शेतकऱ्यांचे दुधासंबंधीचे प्रश्न मांडणार आहोत, असं सदाभाऊ खोत यांनी सांगितलं.



**महागाई वाढत नाही**

गाईच्या दुधाला प्रति लिटरला ४५ रुपये भाव मिळाला पाहिजे. तर म्हशीच्या दुधाला सव्वाशे रुपये प्रति लिटरला भाव मिळाला पाहिजे. ही भाववाढ देणं अवघड नाही. त्यामुळे महागाई वगैरे काही वाढत नाही. उलट शेतकऱ्याला जर भाव दिला तर महागाई निश्चित मनाने कमी होईल. कारण महागाईची ज्यांना झळ पोहचते ती माणसं शेतीवरती काम करायला येतात. शेतकरी मग त्यांना दोन पैसे देतो, असं सदाभाऊ खोत म्हणाले.

**तर हातात नांगर आहे.**

जे सकारात्मक निर्णय घेतील त्यांचं भविष्य उज्ज्वल असेल. सरकारने शेतकऱ्यांच्या बाजूने रहावं. शेतकरी हा कष्टाळू आणि मायाळू आहे. त्या शेतकऱ्याला जर तुम्ही झिडकारलं तर शेतकऱ्याच्या हातात बळी नांगर आहे हे राज्यकर्त्यांनी कधीही विसरू नये, असा इशाराच खोत यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा देवेंद्र फडणवीस यांना दिलाय.

**कारखान्यांसमोर आंदोलन करणार**

गावगाड्यातल्या शेतकऱ्यांच्या पोराला आणि शेतकऱ्याला आम्ही जागं करू. कारण शेतकऱ्याच्या घामाचे पैसे असलेल्या साखर कारखानदारांने ते पैसे दिले नाहीत. पैसे देणे गरजेचे आहे. पेरणी हंगाम तोंडावर आलेला आहे. शेतकऱ्यांकडे अनेक समस्या आहेत. जर ३० जूनपर्यंत पैसे दिले नाहीत तर १ जुलै रोजी साखर कारखांन्याच्या समोर आम्ही धरणे आंदोलन करणार आहोत. त्यावरही कारखान्याने पैसे नाही दिले तर पुढील आंदोलनाची दिशा स्पष्ट केली जाईल, असंही ते म्हणाले.

**उत्पादन खर्च असा होतो**

गाय खरेदी, पशुखाद्य, चारा,विमा,क्रत्रीम रेतन,वैद्यकीय खर्च,मजूरी असा एकूण होणारा खर्च ,त्याला वर्षाचे ३६५ दिवस भागून १ लिटर दुधाला ३६ रूपये ५८ पैसे खर्च येतो.तर शेण विक्रीतून १ रूपया वजा करून ३५ रूपये ५८ पैसे एक लिटर दुध उत्पादनासाठी खर्च येतो असा ठोकताळा शेतकऱ्यांनी काढला आहे. तर सध्या ३.५/८.५ साठी ३१ रूपये प्रतिलिटर प्रणाणे दुध खरेदी केली जात आहे. सरकारने याकडे गांभीर्याने लक्ष न दिल्यास दुधधंदा बंद पडण्याची भिती व्यक्ती केली जात आहे. तर २३ रोजी होणारी बैठक ही फार्स न ठरता ठोस निर्णय घेतला जावा अशी मागणी दुध उत्पादकांनी केली आहे



## ए.जी. पाटील अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी बनविली सेग्वे वेहिकल

**सोलापूर** : येथील विजापूर रोड वरील ए. जी. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयातील मेकॅनिकल च्या अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांनी अभिनव प्रकल्प सादर केला आहे.

या विद्यार्थ्यांनी सोलर सेग्वे वेहिकल म्हणजेच सौर उर्जेवर चालणारी गाडी बनवली आहे. इंधनाचे दर दिवसेंदिवस वाढत आहेत, याशिवाय वाहनांच्या अतिरिक्त वापरामुळे प्रदूषणाच्या समस्येत वाढ झाली आहे. यावर उपाय म्हणून पर्यायी साधनांचा शोध घेतला जात आहे. या संशोधनात आणखी एक भर पडली असून विद्यार्थ्यांनी सौर ऊर्जा आणि इलेक्ट्रिक बॅटरीवर चालणारी सेग्वे वेहिकल बनवली आहे.

युरोपियन देशात सोलर सेग्वे ह्या पोलीस खात्यात पेट्रोलियम साठी वापरण्यात येतात, रेल्वे स्टेशन, लायब्ररी, विमानतळ, डी मार्ट सारखे मॉल, मॅन्युफॅक्चर इंडस्ट्री मध्ये गेस्ट विजिटर्स यांना साईट दाखवण्यासाठी किंबहुना सिनेमा चित्रीकरण यामध्ये सुद्धा याचा उपयोग होऊ शकतो. हा प्रकल्प ए. जी. पाटीलच्या मेकॅनिकल विभागातील प्रणोद गोतसुर्वे, राघवेंद्र सुलतानपुरे, निखिल गवळी आणि गुरुनाथ रेवे या विद्यार्थ्यांनी केला असून या प्रकल्पासाठी प्रा. एस. बी. राठोड यांचे मार्गदर्शन लाभले आहे. संस्थेचे अध्यक्ष ए. जी. पाटील, सचिव एस.ए. पाटील आणि कॅम्पस डायरेक्टर डॉ. एम.ए. चौगुले. प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. पोतदर यांनी प्रोत्साहन देऊन विद्यार्थ्यांच्या अभिनंदन केले.

## जुळे सोलापूर ब्रह्म वधू-वर सेवा मंडळातर्फे ९ जुलै रोजी मोफत परिचय मेळावा

**सोलापूर** : येथील जुळे सोलापूर ब्रह्म वधू वर सेवा मंडळातर्फे रविवार दिनांक ९ जुलै रोजी मोफत वधू-वर परिचय मेळावा आयोजित करण्यात आला आहे. याच मेळाव्यात मंडळातर्फे प्रकाशित करण्यात येणाऱ्या परिचय पुस्तिकेचे प्रकाशन होईल, अशी माहिती संयोजक डी. डी. कुलकर्णी यांनी दिली आहे.

या मेळाव्यासाठी कसलेही शुल्क आकारले जाणार नसून रविवारी दुपारी दोन वाजता डफरीन चौकातील सारस्वत मंगल कार्यालयात हा मेळावा होत आहे. या मेळाव्यात उपस्थित राहणाऱ्या वधूंच्या हस्ते मेळाव्याचे उद्घाटन आणि पुस्तिका प्रकाशन करण्यात येणार आहे. मंडळातर्फे प्रकाशित करण्यात येणाऱ्या पुस्तिकेमध्ये विधवा, विधूर, घटस्फोटीत, दिव्यांग वधू-वरांची मोफत नोंदणी करण्यात येणार आहे. यासाठी संबंधितांनी योग्य ती कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे. तसेच मेळाव्यात सहभागी होणाऱ्या वधूंना परिचय पुस्तिका मोफत दिली जाणार आहे. ३० जून अखेर नोंदणी करणाऱ्या वधू-वरांची नावे पुस्तिकेमध्ये समाविष्ट करण्यात येतील याची नोंद घ्यावी, असे डी.डी. कुलकर्णी यांनी सांगितले. तरी अधिकाधिक इच्छुक वधू-वरांनी या पुस्तिकेसाठी नोंदणी करावी असे आवाहनही डी. डी. कुलकर्णी यांनी केले आहे. नोंदणीसाठी आणि मेळाव्याच्या अधिक माहितीसाठी डी. डी. कुलकर्णी (९८९०८७४०३८) आणि गो.गो. कुलकर्णी (९४२१०४२९९९) यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

## चोरट्याने तीन ट्रकमधील बॅटऱ्या पळवल्या

**सोलापूर** : अज्ञात चोरट्याने तीन ट्रकमधील बॅटऱ्या चोरून नेल्याच्या घटना उघडकीस आल्या आहेत. पहिली घटना हि १४ ते १५ जून दरम्यान कोमल ॲग्रो इंडस्ट्रीज ए.पी.एम.सी यार्ड जवळ घडली.फिर्यादी यलप्पा आयप्पा कटीमनी (वय-५०,रा.मु. पो.हळीसगर,जि.यादगिरी) यांनी वरील ठिकाणी पार्क करून ठेवलेल्या ट्रक क्रं.केए.२३.ए.१७४६ यामधील १० हजार रूपये किमतीच्या दोन बॅटऱ्या चोरट्याने चोरून नेल्या आहेत.या प्रकरणी कटीमनी यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोराटाविरूद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोहेकॉ.आरेनवरू हे करीत आहेत.

तर दुसरी घटना ही हैद्राबाद रोडवरील मुळेगाव क्रॉस एलपीजी पंप जवळ ११ ते १२ जून रोजी घडली.फिर्यादी फैजअहमद राजअहमद नगरवाले (वय-४८,रा.चाँदणी चौक,फॉरेस्ट) यांनी पार्क केलेल्या ट्रक क्रं.केए.२८.डी.०८३७ व ट्रक क्रं.केए.२८. डी.०८३९ या दोन्ही ट्रक मधील १५ हजार रूपये किमतीच्या एकूण ४ बॅटऱ्या चोरून नेल्या आहे.याप्रकरणी नगरवाले यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.त्यांच्या फिर्यादवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा पुढील तपास पोहेकॉ.गायकवाड हे करित आहे.

## योग जागृतीसाठी सोलापुरातून निघाली रॅली

सुराज्य/सोलापूर

जागतिक योग दिनानिमित्त सोलापुरातील विविध योग संघटनांच्या व शासन यांच्या वतीने रविवारी दुपारी शहराच्या प्रमुख मार्गावरुन जनजागृती रॅली काढण्यात आली. या रॅलीत पांढराशुभ्र पोषाख घातलेले पुरुष व महिला योगसाधक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

रविवार दुपारी साडेचार वाजता सेवासदन प्रशाला येथून या रॅलीचा शुभारंभ करण्यात आला. तेथून सरस्वती चौक, चार हुतात्मा पुतळा, सुभाष चौक, दत्त चौकमार्गे नियून ही रॅली सरस्वती प्रशाला येथे विसर्जित करण्यात आली.

या रॅलीत केंद्रीय माहिती प्रसारण विभागाचे अधिकारी अंकुश चव्हाण, नेहरु युवा केंद्राचे समन्वयक अजिकुमार, पतंजली योग समितीच्या केंद्रीय महिला प्रभारी सुधाताई अळळीमोरे, योग दिनाचे समन्वयक मनमोहन भुतडा, गीता परिवाराच्या संगीता जाधव, नगरसेविका व पतंजली योग समिती संचलित भारत स्वाभिमानच्या संगीता शं. जाधव, सुजाता शास्त्री आदी प्रमुखांसह जवळपास एक हजार पुरुष व महिला साधक सहभागी होते. रॅलीत योग प्रचाराच्या घोषणा देण्यात आल्या.

या रॅलीत गीत परिवार, पतंजली योग समिती, योग सेवा मंडळ, योग साधना मंडळ, भारती योग संस्थान, रुद्र अकादमी ऑफ मार्शल आर्ट व योग, योग असोसिएशनश तसेच केंद्रीय संचार ब्युरो क्षेत्रीय कार्यालय, नेहरु युवा केंद्र, जिल्हाधिकारी कार्यालय, पोलीस दल, विविध शाळा, सामाजिक संस्था, महाविद्यालये यांचा सहभाग होता.



**योगदिनी पाच हजार साधक**

जागतिक योग दिन बुधवार दि. २१ जून रोजी सकाळी ६ वाजता हरिभाई देवकरण प्रशालेच्या मैदानावर साजरा केला जाणार आहे. या योगदिनाच्या कार्यक्रमात पाच हजार योगसाधक सहभागी होणार आहेत. यात ५० हून अधिक संस्था सहभागी असतील. ग्रीवा चालनपासून मानेचे व्यायाम, कटी चालन, घुटना संचालन, उठाबशा, उभे राहून करावयाची आसने, योग साधना, ताडासन, वृक्षासन, पादहस्तासन, अर्धचक्रासन असे विविध व्यायाम प्रकार यावेळी घेतली जाणार आहेत. याच कार्यक्रमात शासनाचा मुख्य योगदिनाचा कार्यक्रम होणार असून यावेळी उत्कृष्ट योगशिक्षक, योगशिक्षिका पुरस्कारचे वितरण होणार आहे.

## डॉ संतोष नवले यांची जिल्हा आरोग्य अधिकारी म्हणून सोलापुरात नियुक्ती



**सोलापूर** : सोलापूर जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागात गेल्या आठ-दहा महिन्यापासून जिल्हा आरोग्य अधिकारी हे पद रिक्त होते. त्यां जागी डॉ बागडे यांच्याकडे प्रभारी पदाची सूत्रे होती. त्या ठिकाणी नुकतेच जिल्हा आरोग्य अधिकारी म्हणून धुळे जिल्हा परिषदेतून डॉ संतोष गोविंद नवले यांची प्रभारी जिल्हा आरोग्य अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्याकडे आषाढी वारीमध्ये महा आरोग्य शिबिराचे कामकाजाकरिता अत्यावश्यक बाब म्हणून पुढील आदेश येईपर्यंत त्यांच्याकडे ही जबाबदारी. (नियुक्ती) सोपविण्यात आली असल्याचे कळविण्यात आले आहे.



## मनोरमा मल्टिस्टेट गावच्या विकासात भर घालेल : चव्हाण

### अणदूर शाखेचे उद्घाटन

सुराज्य/सोलापूर

मनोरमा परिवार हा सर्वच क्षेत्रात कार्यरत आहे. श्रीकांत मोरे यांच्यावर लोकांचा विश्वास आहे. त्यामुळेच हा परिवार दिवसेंदिवस वाढत आहे. मी स्वतः मंत्री असताना, महाराष्ट्र राज्य बँकेवर चेअरमन असताना श्रीकांत मोरे यांचे सहकारातील काम जवळून अनुभवले आहे. अणदूर हे गाव व्यापारी वर्ग व शिक्षण क्षेत्रासाठी प्रसिद्ध आहे. त्यामुळे ही शाखा निश्चितच गावच्या विकासात भर घालेल, असे प्रतिपादन माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांनी केले.

मनोरमा मल्टिस्टेट कॉ ऑप. क्रेडिट सोसायटी लि., सोलापूरच्या अणदूर (ता. तुळजापूर, जि. धाराशिव) शाखेचे उद्घाटन रविवारी सायंकाळी प्रमुख पाहुणे, माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी मनोरमा बँकेचे चेअरमन श्रीकांत मोरे होते. प्रारंभी दीपप्रज्वलन करून प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते मनोरमा मल्टिस्टेट अणदूर शाखेचे उद्घाटन करण्यात आले.

चेअरमन श्रीकांत मोरे म्हणाले, चव्हाणसाहेबांचे चांगले मार्गदर्शन व मोठे योगदान लाभल्याचे सांगितले. यावेळी मनोरमा सखी मंचच्या अध्यक्षा शोभा मोरे यांनी मल्टिस्टेटच्या नवीन शाखेच्या उद्घाटनानिमित्त वाढीव व्याजदराचा लाभ घेण्यास सांगितले. यावेळी अणदूरचे सरपंच रामचंद्र आलुरे, उपसरपंच डॉ. नागनाथ कुंभार, श्रीमंत मुळे, महादेव नरे, मारुती खोबरे, केदार आलुरे, मनोरमा मल्टिस्टेटच्या चेअरमन शिल्पा कुलकर्णी, व्हा. चेअरमन कमलाकर पुजारी, सीईओ नंदकुमार भोसले, डेप्युटी सीईओ अरुंधती नायडू संचालक अजय मोरे, मनोरमा बँकेचे अधिकारी नीलकंठ करंडे, बसलिंगप्पा धमगुंडे, पुरुषोत्तम साखरे आदी उपस्थित होते. अजय मोरे यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

## रिक्षा अपघात; जखमीचा उपचारादरम्यान मृत्यू

सुराज्य/सोलापूर

रस्त्यावरून पायी जात असताना रिक्षाच्या धडकेने गंभीर जखमी झालेले जगन्नाथ विश्वनाथ चितळे (वय ५० रा.हणार तीर्थ ता.दक्षिण सोलापूर ) हे शासकीय रुग्णालयात उपचार घेताना रविवारी सायंकाळी मयत झाले .

ते शनिवारी दुपारी ४ वाजेच्या सुमारास सातरस्ता परिसरातील यतीराज हॉटेल पासून मोदी पोलीस चौकीच्या दिशेने पायी निघाले होते . त्यावेळी पाठीमागून एमएच१३-सीटी-८५०१ या क्रमांकाची रीक्षा धडकल्याने ते गंभीर जखमी झाले होते. या अपघाताची नोंद सदर बाजार पोलिसात झाली आहे .

## बाळे येथे ब्लेड, काठी आणि दगडाने मारहाण; तरुण जखमी

**सोलापूर** : पूर्वीच्या भांडणावरून ब्लेड, काठी आणि दगडाने मारहाण करून तरुणास जखमी करण्यात आले. ही घटना अंबिका नगर बाळे येथे रविवारी रात्रीच्या सुमारास घडली.

विकास उर्फ पप्पू सुरेश दोरकर (वय २८ रा.गणेश नगर बाळे) असे जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे . त्याला उपचारासाठी आकाश (भाऊ) यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले . काल रात्री आठ वाजेच्या सुमारास त्याला सुनील भोसले, बाबा भोसले, समाधान सुरवसे आणि इतर ७ जणांनी मिळून मारहाण केली . अशी प्राथमिक नोंद फौजदार चावडी पोलिसात झाली आहे .

## नई जिंदगी परिसरात दोन गटात चाकू आणि काठीने मारहाण; दोघे जखमी

सुराज्य/सोलापूर

पैशाच्या व्यवहारातूनदोन गटात चाकू काठी आणि दगडाने झालेल्या मारहाणीत दोघेजण जखमी झाले. ही घटना नई जिंदगी परिसरातील भाग्यलक्ष्मी नगर येथे रविवारी रात्रीच्या सुमारास घडली .त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

गौस रियाज मुल्ला (वय २४ रा.सिद्धेश्वर नगर भाग ४) असे पहिल्या गटातील जखमीचे नाव आहे . तो काल रात्री १२ वाजेच्या वाजण्याच्या सुमारास भाग्यलक्ष्मी नगर येथे गेला होता. पैशाच्या व्यवहारातून त्याला मोहसीन शेख, बाबा शेख आणि इतर तीन जणांनी चाकू आणि काठीने मारहाण केली.

तर दुसऱ्या गटातील मोहसिन फारुक शेख (वय २५ रा. भाग्यलक्ष्मी नगर ) हा जखमी झाला.

त्याच्या घराजवळ येऊन पैशाच्या व्यवहारातून गौस मुल्ला, आफताब पटेल आणि इतर दोघांनी काठी आणि दगडाने मारहाण केली. या दोन्ही घटनांची नोंद एमआयडीसी पोलिसात झाली आहे.

# फक्त एकाच उत्पादनावर अवलंबून राहू नये : सचिन कुलकर्णी

सुराज्य/सोलापूर

**टेक्सटाईल उद्योगात अनेक क्रांतिकारक बदल होत आहेत. अनेक नवनवीन उत्पादने बाजारात येत आहेत. त्यामुळे सोलापुरातील यंत्रमाग उद्योजकांनी फक्त टेरी टॉवेल उत्पादनावर अवलंबून न राहता आपल्या क्षमतेनुसार नवनवीन उत्पादनांची कास धरावी, असे स्पष्ट प्रतिपादन टेक्सटाइल तज्ञ सचिन कुलकर्णी यांनी केले. टेक्सटाईल डेवलपमेंट फाऊंडेशन (टीडीएफ) च्या वतीने आयोजित चर्चासत्रामध्ये ते बोलत होते.**


जवळपास चार तास चाललेल्या मॅरेथॉन चर्चासत्रात अतिशय सखोल, मुद्देसूद, परखडपणे सोलापुरातील यंत्रमाग उद्योजकांच्या प्रगतीसाठी व्यावहारिक उपाय सुचविताना अनेक उदाहरणे दिली.

एकच कारखानदार डाईंग, बॅक प्रोसेस, विव्हींग, फिनिशिंग, मार्केटिंग असे सर्वच विभागाची जबाबदारी घेतल्यास उद्योगाच्या प्रगतीला खूप मर्यादा येतात. कोणत्याही उद्योगाचा सर्वात महत्वपूर्ण विभाग म्हणजे मार्केटिंग. त्याकडे दुर्लक्ष करून केवळ उत्पादन निर्मिती आणि इतर कामामध्ये व्यस्त राहिल्यास उद्योगाची प्रगती कदापि शक्य नाही.

कारखानदारांनी सर्वात जास्त लक्ष मार्केटिंगकडे दिले पाहिजे. प्रसंगी गरजेप्रमाणे उत्पादन निर्मितीसंबंधी आऊटसोर्सिंग केले पाहिजे.

मार्केटिंगसाठी पूर्णपणे एजंटवर अवलंबून न राहता समविचारी कारखानदारांनी एकत्र येऊन मार्केटिंगसाठी स्वतंत्र कंपनी काढावी आणि त्यामार्फत व्यावसायिक तज्ञ लोकांना नेमून त्यांच्यामार्फत व्यवस्थापन चालवावे आहे त्या यंत्रमाग आणि रेपियर लूममध्ये किरकोळ बदल करून प्रचंड वेगाने वाढत असलेल्या आणि जास्त नफा देणाऱ्या टेक्निकल टेक्सटाईल संबंधित विविध उत्पादननिर्मिती सुरू करावी.

कॉटन, पॉलिस्टर एवढ्यावरच मर्यादीत न राहता, दर्जेदार टॉवेल निर्मितीसाठी हेंप, सिसल, बांबू इत्यादी धाग्यांचा वापर करावा. टेरी टॉवेल ऐवजी सध्या कमी वजनाचे आणि जास्त पाणी शोषून घेणाऱ्या मायक्रोफायबर आणि इतर टेक्निकल टेक्सटाईल उत्पादनांची



मागणी प्रचंड वेगाने वाढत आहे. याकडे तातडीने लक्ष द्यावे.

वार्प निटिंग मशीनच्या साहाय्याने सध्या जास्त मागणी असलेल्या अनेक उत्पादनांची निर्मिती करता येते. टेक्सटाईल उद्योगात परंपरागतरित्या विणकाम केलेल्या कापडाऐवजी नॉन-वोव्हन उत्पादनांचा वापर आणि निर्मिती प्रचंड वेगाने वाढत आहे. याकडे दुर्लक्ष केल्यास सोलापुरातील यंत्रमाग उद्योग फार काळ चालू शकणार नाही.


या चर्चासत्राचे प्रास्ताविक टीडीएफचे अध्यक्ष श्रीनिवास बुरा यांनी केले. रात्री दहा वाजेपर्यंत चाललेल्या या मॅरेथॉन चर्चासत्रामध्ये गोविंद झंवर, श्रीनिवास गुंडेटी, सिद्धेश्वर गड्डम, रविंद्र आकुडे, व्यंकटेश बिंगी, रंगनाथ बंग, अमित चंडक, गोवर्धन कोडम, कौस्तुभ करवा, अमित राठी, शैलेश सोमाणी, वेणुगोपाल अल्ली, राजेंद्र अंबालढगे, शंकर जागीलम, संजय मड्डुर, प्रवीण कोटा, जगदीश कोडम, योगेश म्याकल, लक्ष्मीकांत मुंदडा, प्रतीक भट्टड, आदींसह जवळपास १२५ कारखानदार उपस्थित होते.

# पाण्याचा प्रश्न सोडवून मतदारांना दिलेला शब्द पाळला : खा. रणजितसिंह निंबाळकर

✔ सुराज्य/सांगोला

**नीरा देवधरच्या प्रकल्पासाठी १०० कोटी रुपयांची बजेटमध्ये तरतूद करण्यात आली आहे. या योजनेसाठी ३१०० कोटी रुपयांची आवश्यकता असून केंद्र सरकारकडे अडीच हजार कोटी रुपयांची मागणी करणार आहोत. कायम दुष्काळी असणाऱ्या फलटण, सांगोला, माण, खटाव, माढा, करमाळा, माळशिरस तालुक्यातील ५० हजार हेक्टर क्षेत्राला फायदा होणार आहे. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत मतदारसघांतील पाण्याचा प्रश्न शिल्लक ठेवणार नसल्याचा मतदारांना शब्द दिला होता. अपेक्षेप्रमाणे मी मतदारांना दिलेला शब्द पाळला असून येणाऱ्या २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत पाण्याचा प्रश्न राहणार नसल्याचे खासदार रणजितसिंह निंबाळकर यांनी सांगितले.**

कायमच दुष्काळी असणाऱ्या फलटण, सांगोला, माण, खटाव, माढा, करमाळा, माळशिरस तालुक्यातील तालुक्यातील ५० हजार हेक्टर क्षेत्राला फायदा होणाऱ्या नीरा देवघर योजनेला महाराष्ट्राच्या बजेटमध्ये १०० कोटी रुपये मंजूर झाल्याने भाजप खासदार रणजित निंबाळकर यांनी मास्टरस्ट्रोक लगावला आहे. नीरा देवधर प्रकल्पासाठी ५०० कोटी रुपयांचे टेंडर काढण्याची सूचना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या आहेत. यातील ३०० कोटी रुपयांचे टेंडर आठ दिवसात निघतील. नीरा देवधर प्रकल्पासाठी ३१०० कोटी रुपयांचा निधीची आवश्यकता आहे. मी केंद्राच्या जलशक्ती बोर्डाचा सदस्य असून या योजनेसाठी केंद्र सरकारकडे अडीच हजार कोटी रुपयांची मागणी करणार आहे. माढा तालुक्यातील कुकडी प्रकल्पाच्या पाण्याचे फेरवाटप होणार असून यात मांगी तलावाचा समावेश करण्याची मागणी केली आहे. रींटेवाडी उपसा सिंचन प्रकल्पातून करमाळा तालुक्याला पाणी देण्याची योजना आखली आहे.



नीरा देवघर डावा कालवा ६६ किलोमीटर ते १५८ किलोमीटर आणि उजवा कालवा ११ किलोमीटर ते ६५ किलोमीटर मध्ये अस्तरीकरण तसेच गावडेवाडी, शेख मिरवाडी आणि वाघोशी येथे उपसा सिंचन योजनेचा समावेश या कामात करण्यात आला आहे.

यासाठी चालू वर्षी १०० कोटी रुपये निधी मंजूर झाला असून ३१९ कोटींच्या सूचीस शासनाने मान्यता दिली आहे. यामध्ये नीरा उजवा ७७ ते १३१ किलोमीटर मधील बंदिस्त मालिकेद्वारे मुख्य कालवा आणि त्यावरील वितरण व्यवस्थेचे काम करण्याचा समावेश आहे . नीरा देवघर प्रकल्पांतर्गत फलटण तालुक्यातील उजवा कालवा ७७ ते १३१ किलोमीटर इतकी लांबी येते. हा भाग कायम दुष्काळी असल्याने फलटण तालुक्यातील किमान १० किलोमीटर लांबीचे काम हाती घेण्याचा आग्रह खा.निंबाळकर यांनी लावून धरला होता. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत मतदारसघांतील पाण्याचा प्रश्न शिल्लक ठेवणार नसल्याचा मतदारांना शब्द दिला होता. त्यानुसार मतदारसंघातील जीहे कठापूर, उरमोडी, नीरा देवधर, खैराव, मानेगाव, परितेवाडी, दहिगांव, रींटेवाडी या सिंचन प्रकल्पातून पाण्याचा प्रश्न सोडवला आहे. मी मतदारांना दिलेला शब्द पाळला असून मतदारसंघातील सर्वच तालुक्यांचा पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवण्यासाठी टोकाचे प्रयत्न सुरु केले आहेत. त्यामुळे येणाऱ्या २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत पाण्याचा प्रश्न राहणार नसल्याचे खासदार रणजितसिंह निंबाळकर यांनी सांगितले.




## आपुलकी प्रतिष्ठानच्या वतीने शैक्षणिक साहित्याचे वाटप

✔ **सांगोला :** आपुलकी प्रतिष्ठानच्या वतीने गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. रविवारी कविराज मंगल कार्यालय येथे झालेल्या या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. संतोष पिसे तसेच गायत्री मार्टचे सचिन वाघमारे यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात १५ विद्यार्थी व विद्यार्थिनींना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. यावेळी बोलताना डॉ. पिसे म्हणाले की, समाजाच्या तळागाळापर्यंत जाऊन योग्य व्यक्तींपर्यंत मदत पोहोचविण्याचे काम आपुलकी प्रतिष्ठान करत आहे. हे काम खरोखरच कौतुकास्पद असून ज्या विद्यार्थ्यांना आज शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले आहे, त्यांनी याची जाणीव ठेऊन आपले शिक्षण मन लावून पूर्ण करावे व आपणही मोठे झाल्यानंतर समाजोपयोगी कार्य करण्याचा आपुलकीचा आदर्श घेऊन आपली वाटचाल करावी व गोरगरिबांना मदत करण्याचे महान कार्य करावे असे सांगितले.वाढेगाव येथील जोतिराम ऐवळे यांना वैद्यकीय उपचारासाठी पाच हजार रुपयांचा धनादेश यावेळी पाहुण्यांच्या हस्ते देण्यात आला. शेवटी अरुण जगताप गुरुजी यांनी आभार मानले.यावेळी आपुलकीचे सचिव संतोष महिमकर व सदस्य तसेच विद्यार्थी, विद्यार्थिनी व त्यांचे पालक उपस्थित होते.



## शिवरत्न शिक्षण संस्थेत देशभक्तांची ओळख व शाळा तिथे क्रांती मंदिर अभियान

✔ **अकलूज :** कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्टचे देशभक्तकोशकार चंद्रकांत शहासने यांच्या संग्रहात असलेल्या २००० क्रांतिकारकांचे छायाचित्र, १०,३११ हुतात्म्यांची महिनावर नोंद .१०,००० क्रांतिकारकांची माहिती देणारा असा देशभक्तकोश या साहित्याचा दुर्मीळ असा डिजीटल डेटा शांततेचा नोबेल पुरस्कार नामांकन प्राप्त डॉ स्वयंप्रभादेवी मोहिते-पाटील व रणजितसिंह मोहिते-पाटील या मान्यवरांच्या हस्ते शिवरत्न शिक्षण संस्थेकडे सुपुर्द करण्यात आला. शिवरत्न शिक्षण संस्था हा डीजीटल डेटा माळशिरस तालुक्यातील विविध शाळांकडे सुपूर्त करणार आहे. ज्यायोगे शाळांमध्ये ओळख देशभक्तांची, शाळा तेथे क्रांतीमंदीर हे अभियान पोहोचेल व भारतीय क्रांतिवीरांच्या बलिदानाचा,राष्ट्र कार्याचा इतिहास विद्यार्थ्यांना अधिक ज्ञात होईल. कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्टचे विश्वस्त देशभक्तकोशकार श्री.चंद्रकांत शहासने यांनी शाळेतील विद्यार्थ्यांच्या करीता ओळख देशभक्तांची व शाळा तेथे क्रांतीमंदीर या चालवलेल्या अभियानाद्वारे विद्यार्थी-विद्यार्थिनी करीता क्रांतिकारकांची दुर्मीळ माहीती उपलब्ध करून देणे म्हणजे एका प्रकारचे राष्ट्रकार्यच आहे. अशी प्रतिक्रिया शिवरत्न शिक्षण संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष धैर्यशिल मोहिते-पाटील यांनी कार्यक्रमा प्रसंगी व्यक्त केली. सदर कार्यक्रमास चंद्रकांत शहासने संस्थेचे संचालक श्रीकांत राऊत ,दिलीप चित्रे महाराज, प्रिन्सीपल अल्बर्ट थरकन, बिनो के पाऊलस , विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व इतर मान्यवर उपस्थित होते.



## वागदरी रथोत्सवात दुर्घटनेतील परिवाराला दिला ग्रामस्थांनी आधार

✔ **अक्कलकोट :** वागदरी येथील रथयात्रेत अपघाती घटनेत दुर्दैवाने दोघाचे जीव गेले.घरातील कर्ता पुरुष गेल्याने संबंधित कुटुंबावर संकट कोसळले त्यांना मदत करण्यासाठी अनेक हात पुढे आले.तसेच सरपंच श्रीकांत भैरामडगी ,तंटामुक्त अध्यक्ष शाणप्पा मंगाणे, सदस्य शिवानद घोळसगांव, घाळय्या स्वामी, शांतेश्वर कोटे,मल्लिनाथ शेळके यांनी मदत समिती स्थापन करून दोन्ही कुटुंबासाठी मदतनिधी गोळा करण्यात आले. छोटे कानी कार्यक्रमात श्री परमेश्वर मंदिरात कै. संजय नंदे व कै.गंगाराम मंजुळकर यांच्या कुटुंबांना समिती व गांवकऱ्याच्या वतीने जमा झालेले रक्कम ९.९०००० नऊ लाख नव्वद हजार रुपये जमा पैकी दोन्हीं कुटुबास निम्मे निम्मे मदत रक्कम देण्यात आले. यावेळी सरपच श्रीकांत भैरामडगी ,तंटामुक्त अध्यक्ष शाणप्पा मंगाणे,श्री परमेश्वर देवस्थान ट्रस्ट चे सिध्दायाम बटगेरी,बसवराज धड्डे ,कैलास धडे, शिवलिंगप्पा दुर्ग, शिवानंद बाबा,माजी सरपंच रविकिरण वरनाळे, सुधीर सोनकवडे ,उपसरपंच लक्ष्मीबाई पोमाजी, ग्रामपंचायत सदस्य शिवानंद घोळसगाव, हनिफ मुल्ला ,पंकज सुतार ,श्रीकांत इंडे, विकास नजुंडे ,शारदाबाई रोटे ,शंकर युंगरे, परमेश्वर पोमाजी,शिवाजी सावंत,शिवानंद गोगाव, शिवशरणप्पा सुरवसे, चंद्रकांत मातोळे , सुनिल सावत,सतोष पोमाजी,चंद्राम पोमाजी,सुरेश माने, विजय हरकारे, परमेश्वर यमाजी ,कणमुसे परमेश्वर, मृगेद्र मुदिनकेरी,श्रीशैल पोमाजी, राम संघट, विजय शिंदे,महादेव सोनकवडे, राम सोनकवडे, रवी निलगार ,या ग्रामस्थांच्या उपस्थित ही मदत देण्यात आली.

## लोकमंगलच्या लोटस योजनेद्वारे अठरा विद्यार्थ्यांना धनादेशाचे वाटप

✔ **सोलापूर :** लोकमंगल फाउंडेशन संचलित लोटस योजनेअंतर्गत गरीब, गरजू गुणवंत विद्यार्थ्यांना शैक्षणिक आर्थिक मदत म्हणून एकूण १८ विद्यार्थ्यांना ३ लाख ३० हजार २५० रुपयांचे धनादेश वाटप करण्यात आले.या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून सोलापूर शहरातील व्यापारी विशाल बंसल व पुण्याचे लोटस अंतर्गत लाभ घेतलेले डॉ. बिराजदार यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी लोकमंगल फाउंडेशनचे संचालक जयवंत थोरात, मारुती तोडकर, उपस्थित होते. यावेळीलोटस योजनेतील कमिटी मेंबर मोरे, डॉ.प्रवीण ननवरे, डॉ. सुधीर ननवरे हे देखील उपस्थित होते. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे व विद्यार्थी यांनी आपले मनोगत व्यक्त केले.लोकमंगल फाउंडेशन संचलित लोटस योजनेची सुरुवात २०१५ पासून सुरुवातझाली. आजपर्यंत एकूण जवळपास २०० विद्यार्थ्यांना एकूण ७७ लाख ४१ हजार ८२ रुपयांची शैक्षणिक मदत करण्यात आली आहे.

## माळशिरस तालुक्यातील पर्यटनासाठी साडे चार कोटी मंजूर : आ. राम सातपुते

✔ सुराज्य/पिलीव

माळशिरस तालुक्यातील पर्यटनासाठी साडेचार कोटी मंजूर झाले असल्याची माहिती माळशिरस तालुक्याचे आमदार राम सातपुते यांनी पत्रकार परिषदेत दिली. राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व विधान परिषदेचे आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांच्या सहकार्याने हा निधी मंजूर झाला असल्याची माहिती दिली.



माळशिरस तालुक्यातील पिलीव महालक्ष्मी मंदिर येथे पेविंग ब्लॉक बसवणे, देवस्थान येथे उड्डाणपूल ते सातारा पंढरपूर रोड अंतर्गत रस्ता करणे, देवालयासाठी भक्तनिवास बांधणे , महिलांसाठी व पुरूषांसाठी शौचालय स्नानगृह बांधकाम करणे व भक्तनिवास बांधकाम करणे आदी कामांसाठी १ कोटी ९६ लाख रुपये चा निधी, तालुक्यातील कारंडे येथील श्रीनाथ मंदिर देवस्थान भक्त निवास व मंदिर परिसर सुधारणा करणे वाहन बांधकाम करणे यासाठी ३६ लाख ६५ हजार रुपये चा निधी तर मारकडवाडी येथे वशया मारुती मंदिर ऑल कंपाऊंड बांधकाम पाण्याची टाकी शौचालय बांधकाम मंदिर परिसर सुशोभीकरण मारुती मंदिर बुरूज यु सी आर परिसर बांधकाम करणे पर्यटन हॉल बांधणे आदींसाठी २ कोटी १० लाख रूपये तर तांबवे येथील खंडोबा मंदिर येथे ऑल कंपाउंड व पेविंग ब्लॉक साठी सात लाख ३१ हजार रुपये चा निधी असे एकूण साडेचार कोटी रुपये चा निधी मंजूर असल्याची माहिती आमदार राम सातपुते यांनी दिली.

## स्वेरीच्या ९ विद्यार्थ्यांची भारत फोर्ज कंपनीत निवड

✔ सुराज्य/पंढरपूर

भारत फोर्ज लिमिटेड' या बहुराष्ट्रीय दर्जाच्या कंपनीने घेतलेल्या मुलाखतीत गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित अभियांत्रिकी महाविद्यालयातील ९ विद्यार्थ्यांची कॅम्पस इंटरव्युवद्वारे निवड करण्यात आली आहे.' अशी माहिती संस्थेचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांनी दिली.

भारत फोर्ज लिमिटेड' या नामांकित व बहुराष्ट्रीय दर्जाच्या कंपनीच्या निवड समितीने गोपाळपूर येथील इंजिनिअरिंग कॉलेजमधील विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या. त्यांनी या निवड प्रक्रियेच्या अंतिम फेरीतून मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागातून बालाजी राजेंद्र पिसे, प्रथमेश दीपक यादव, गौरव शिवाजी घायतिडक, राकेश प्रकाश बिराजदार, इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागातून कुलदीप रंगराव देसाई, सचिन नागनाथ तोडकरी व प्रविण लक्ष्मण कांबळे तर इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभागामधून सुमेध संजयकुमार गायकवाड व महेश सुनील देशमुख




अशा मिळून एकूण ०९ विद्यार्थ्यांची निवड केली. सदर विद्यार्थ्यांना ट्रेनिंग अँड प्लेसमेंट व संबंधित विभागातील प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे, संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख तसेच संस्थेचे पदाधिकारी व विश्वस्त, स्वेरी अंतर्गत असलेल्या इतर महाविद्यालयांचे प्राचार्य, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासह पालकांनी भारत फोर्ज लिमिटेड' या कंपनीममध्ये कॅम्पस इंटरव्ह्यूमधून निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## शिक्षकांनी शिकवण्याआधी स्वत: वाचन करणे गरजेचे : ठोंबरे

### लोकमंगल फौंडेशनतर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

✔ सुराज्य/दक्षिण सोलापूर

शिक्षक हे विद्यार्थ्यांचे गुरु असतात. त्यांच्यामुळेच विद्यार्थी घडत असतात त्यामुळे शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शिकवण्याआधी स्वतः वाचन करणे खूप महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन प्र. जिल्हाधिकरी तुषार ठोंबरे यांनी केले.

लोकमंगल फाउंडेशन व महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद सोलापूर शहर यांच्या संयुक्त विद्यमाने दहावीच्या गुणवंतांचा कौतुक सोहळा हरिभाई देवकरण प्रशाला येथील मुळे हॉल येथे पार पडला, त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ठोंबरे



बोलत होते. यावेळी श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान येथील सचिवा डॉक्टर अनिता ढोबळे , लोकमंगल बँकेचे संचालक अभियंता प्रल्हाद कांबळे ,लोकमंगल फाउंडेशनचे संचालक मारुती तोडकर, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे अध्यक्ष मोहन पाटील, सुरेश राठोड, जितेंद्र पवार, अविनाश कुंभार, सतीश भोसले, विश्वनाथ कुलकर्णी, बापू माने प्रा. यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमात सोलापूर शहरातील माध्यमिक शाळा मधील दहावी मध्ये प्रथम येणारे विद्यार्थी आणि विद्यार्थिनी मिळून एकूण ११० विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आला.

यावेळी २% सेवानिवृत्त शिक्षक व पाच गुणवंत शिक्षक यांचा देखील सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे सर्व सदस्य व लोकमंगल फाउंडेशनचे संचालक विद्यार्थी पालक व शिक्षक उपस्थित होते.

## निमगाव येथे चंदन चोरांना अटक १ लाख ७० हजारांचा माल जप्त

✔ सुराज्य/अकलूज

चंदनाची चोरी करून ती विकण्यासाठी जात असताना अकलूजच्या पोलिसांनी दोघांना अटक करून ८० हजाराचे चंदन आणि दुचाकि असा एकूण १ लाख ७० हजाराचा माल जप्त केला. ही घटना निमगाव (ता. माळशिरस) येथे शनिवारी सायंकाळच्या सुमारास करण्यात आली.

संतोष हनुमंत पवार (वय २१) आणि सचिन ज्ञानदेव पवार (वय ३५ दोघे रा. वरकुटे ता. इंदापूर) अशी अटकेत असलेल्या आरोपींची नावे आहेत. ते दोघे आपल्या दुचाकिवरून ४० किलो वजनाचे चंदन घेऊन प्रवास करीत होते. अकलूजच्या पोलिसांनी त्यांना निमगाव येथे अटक करून त्यांच्याविरुद्ध पोलिसात गुन्हा दाखल केला. पुढील तपास हवालदार घाटगे करीत आहेत.

## हालहळ्ळी (अ) येथील वाचनालयात बाल-कुमार ज्ञानकोपरा विभाग

✔ सुराज्य/अक्कलकोट

स्वातंत्र्यवीर सावरकर सार्वजनिक वाचनालय हालहळ्ळी (अ) ता.अक्कलकोट येथील वाचनालयात बाल व कुमार वाचकासाठी बाल - कुमार ज्ञानकोपरा विभाग सुरु करण्यात आले. प्रथम सदरील उपक्रमाबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने दि.१२ जून रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. त्यानुसार दि. १३ जून रोजी दुपारी १२.३० वाजता बाल कुमार ज्ञानकोपरा कक्ष स्थापित करण्यात आले.

सर्वप्रथम बाल वाचक कुमारी प्रगती भिमण्णा बिराजदार हिच्या हस्ते फित कापून या उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. वाचनालयामार्फत सर्व बाल कुमार वाचकाचे स्वागत करण्यात आले. ग्रंथपाल गुरुनाथ गोविंदे यानी सदरील उपक्रमाची माहिती करुन दिली. लहान वयातच मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी या मुलांच्या हातात पुस्तक सोपविणे गरजेचे आहे आणि ती सेवा वाचनालयाने



विनामुल्य तसेच निरंतर पुरविण्याचे उदिष्ट ठेवले असून त्यासाठी ग्रंथालय संचालनालय महाराष्ट्र राज्य व जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय सार्वजनिक ग्रंथालयाना सर्व प्रकारचे सहकार्य करणार असल्याचे गोविंदे यांनी सांगितले.तसेच गावातील सर्व बाल व कुमार वाचकाना वाचक सभासद करुन घेतल्याची माहिती दिली.

या यावेळी जि. प. प्रा. शाळेचे सह शिक्षक नदाफ यांनी विद्यार्थ्यासाठी खूप चांगला उपक्रम असल्याचे सांगून मुलांना अवांतर वाचनाची सवय लावण्यासाठी ग्रंथालयाकडे पाठवावे असे आवाहन उपस्थित पालकांना केले व सदरील वाचनाल्यशाळा दत्तक उपक्रमांतर्गत शाळेस वेळोवेळी उपयुक्त वाचन साहित्य पुरविल्याबद्दल संस्थेचे ऋणी असल्याची भावना व्यक्त केली. सर्व बाल व कुमारवाचकाना आपापल्या आवडीचे वाचन साहित्य देऊन या उपक्रमशील कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## कामती येथे विष पिऊन आत्महत्या

✔ **सोलापूर :** कामती(ता. मोहोळ ) येथे राहणाऱ्या आदिल अहमद शेख (वय ३२) याने विष पिऊन आत्महत्या केली. रविवारी दुपारी तीन वाजेच्या सुमारास त्याने राहत्या घरात विष प्राशन केले होते.

त्याला उपचारासाठी परवीन शेख (मामी) यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. उपचारादरम्यान तो सोमवारी सकाळी मयत झाला. या घटनेची नोंद तालुका पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही .

# बहिणीच्या मुलीसाठी मावशी आली धाऊन

### किडनी दान देऊन वाचवले प्राण

✔ सुराज्य/नातेपुते

माळशिरस तालुक्यातील उंबरे दहिगाव येथे बहिणीच्या मुलीला मावशीने किडनी दान देऊन जीवनदान दिले.

पत्रकार भगवान घुगरदरे यांच्या पत्नी हेमा यांच्या बहिणीची मुलगी व विनिता विजयकुमार देशपांडे (पती ज्ञानेश्वर रुईकर) राहणार बीड यांच्या दोन्ही किडन्या खराब झाल्याने त्यांना किडनीची गरज होती त्यांनी सर्वांच्या मॅच करून बघितले असता त्या मॅच होत नव्हत्या त्यावेळेस त्यांनी हेमा यांना सांगितले.

त्यावेळी त्यांनी आपली किडनी चेक करण्यासाठी सांगितले व ती त्यांना लागू पडल्याने त्यांनी आपल्या बहिणीच्या मुलीसाठी आपली किडनी दान करण्याचे ठरविले.

याबाबतीत त्यांना कोणीही विरोध न केल्याने व मावशीने हे किडनी आपल्या बहिणी च्या मुलीसाठी करत असल्याने त्यांचे ऑपरेशन नक्की झाले व हे किडनी प्रत्यारोपण ऑपरेशन सोलापूर येथील, यशोधरा हॉस्पिटलमध्ये २५ मे ला पार



पडले. डॉ. निलरोहित पैके (एम.डी, डी. एम नेप्रो, किडनी प्रत्यारोपण व किडनी विकार तज्ज्ञ) व डॉ. हेमंत देशपांडे (एम एस, डीएनबी यूरोलॉजी, किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया व किडनी विकार शल्यचिकित्सक) यांच्या पूर्ण टीम ने ही शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पाडली.

ऑपरेशन झाल्यानंतर दोघांची तब्येत चांगली असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. याबाबत मावशी हेमा घुगरदरे यांना याबाबत विचारले असता त्यांनी सांगितले की, ही माझ्या बहिणीची मुलगी होती. मला मुलगी नसल्याकारणाने मी बहिणीच्या मुलींना मुलगीच मानते व तिच्यासाठी माझा शरीरातला एक अवयव मला दान करावा लागला हे माझ्यासाठी फार मोठ्या भाग्याचा आहे.

या ऑपरेशनसाठी मला माझ्या घरातील माझे पती भगवान घुगरदरे व मुलं हर्षल व भूषण यांनी व नातवांनी प्रोत्साहन दिल्याने व माझ्या पाठीशी ठामपणे उभे राहिल्याने किडनी दान करू शकले असे सागितले.

# राज्य मंत्रिमंडळाचा विस्तार पावसाळी अधिवेशनापूर्वी

## ▶ १० जुलैच्या आधी प्रक्रिया आटोपणार

## ▶ फक्त १० जणांना संधी मिळण्याची शक्यता

✔ सुराज्य/मुंबई

**शिंदे-फडणवीस सरकारच्या बहुप्रतिक्षीत मंत्रिमंडळ विस्ताराला अद्याप मुहूर्त मिळालेला नाही. अधुनमधून चर्चा होण्यापलीकडे मंत्रिमंडळ विस्ताराचे गाडे जराही पुढे सरकताना दिसत नाही. त्यामुळे शिवसेना आणि भाजपमधील मंत्रिपदासाठी इच्छूक असलेले आमदार मंत्रिमंडळ विस्तार कधी होणार, याकडे डोळे लावून बसले आहेत. यासंदर्भात भाजपचे मंत्री आणि देवेंद्र फडणवीस यांच्या मर्जीतील नेते गिरीश महाजन यांनी भाष्य केले आहे. मंत्रिमंडळ विस्ताराची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून जवळपास १० नव्या मंत्र्यांना मंत्रिमंडळात सामावून घेतले जाऊ शकते, असे गिरीश महाजन यांनी सांगितले. तसेच शिवसेना आणि भाजप या दोन्ही पक्षांकडून मंत्रिमंडळ विस्तारात महिलांना सधी दिली जाऊ शकते, याची दाट शक्यता आहे.**



गिरीश महाजन यांनी दिलेल्या माहितीनुसार, आता शिवसेना आणि भाजप असे दोन पक्ष असल्यामुळे संभाव्य मंत्र्यांची नावे आणि खातेवाटपाची चर्चा सुरु आहे. ही सगळी बोलणी आता अंतिम टप्प्यात आली असून येत्या काही दिवसांत मंत्रिमंडळ विस्तार होईल. शिंदे गटातून कोणाला संधी मिळणार, याचा निर्णय एकनाथ शिंदे घेतील. तर भाजपमधून कोणाला मंत्री करायचे, याचा निर्णय आम्ही घेऊ. मंत्रिमंडळ विस्तारात फक्त १० जणांना सामावून घेतले जाणार असल्याने कोणालाही संधी मिळू शकते, असे गिरीश महाजन यांनी म्हटले.

गेल्या काही महिन्यांमध्ये मंत्रिमंडळाचा विस्तार होणार, अशी आवई अनेकदा उठली आहे. मात्र, त्यासंदर्भात ठोस असे काही घडले नव्हते.

सुरुवातीला २ जून रोजी मंत्रिमंडळ विस्तार होणार, असे सांगितले गेले. त्यानंतर मंत्रिमंडळ विस्ताराची तारीख शिवसेनेच्या वर्धापन दिनापर्यंत म्हणजे १९ जूनपर्यंत पुढे ढकलण्यात आली होती. मात्र, आजदेखील मंत्रिमंडळ विस्तार होण्याच्या हालचाली दिसत नाहीत. त्यामुळे आता पावसाळी अधिवेशनाच्या आधी म्हणजे १७ जुलैपूर्वी शिंदे-फडणवीस सरकारचा मंत्रिमंडळ विस्तार पार पडेल, असे समजते.

सध्याच्या मंत्रिमंडळात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस वगळता शिवसेना-भाजपचे प्रत्येकी ९ मंत्री आहेत. शिंदे यांच्यावर मंत्रिपदासाठी जवळपास ३० आमदारांचा दबाव आहे. तर भाजपच्या उर्वरित ९६ आमदारांपैकी कोणाला मंत्रिमंडळात घ्यायचे हा प्रश्न वरिष्ठ नेतत्त्वाला पडला आहे. गेल्यावेळी मंत्रिमंडळ विस्तारात शिंदे गटातील अनेकांना संधी मिळाली नव्हती. त्यामुळे यावेळी यापैकी कोणत्या आमदारांना मंत्रीपद मिळणार हे पाहावे लागेल.

### महिला उमेदवारांना संधी मिळणार !

शिंदे-फडणवीस सरकारमध्ये एकही महिला मंत्री नसल्याने टीकेचा सूर उमटला होता. त्यामुळे यावेळच्या मंत्रिमंडळ विस्तारात शिवसेना आणि भाजप दोन्हीही पक्ष प्रत्येकी किमान एका तरी महिला आमदाराला मंत्रिमंडळात सामावून घेतील, असा अंदाज आहे.

### सोलापूर जिल्ह्याला ठेंगा?

शिंदे-फडणवीस सरकारमध्ये सोलापूर जिल्ह्याला मंत्रीपद मिळणार की आघाडी सरकारने जसा ठेंगा दाखविला तसेच होणार?, हा प्रश्न अनेकांना पडला आहे. जिल्ह्यात भाजपाचे पाच आमदार आहे. एक अपक्ष आमदारही भाजपाच्या बाजूने आहे. तसेच शिंदे गटाचा एक आमदार आहे. आघाडी सरकारमध्ये आणि आताही लादलेला पालकमंत्री सोलापूरचे अनुभवला आहे. आता नव्याने होणाऱ्या मंत्रीमंडळात जिल्ह्याला मंत्रीपद देऊन जिल्ह्यातलाच पालकमंत्री होईल की नाही? यावर तर्कवितर्क वर्तविले जात आहे. दरम्यान हाती आलेल्या माहितीनुसार सोलापूर जिल्ह्याला मंत्रीमंडळात ठेंगा दाखविला जाण्याची शक्यता आहे.

## ▶▶ महत्त्वाचे वृत्त

### ‘वैद्यनाथ’च्या अध्यक्षपदी पंकजा मुंढे



✔ **बीड** : परळीच्या वैद्यनाथ सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुका बिनविरोध पार पडल्या आहेत. कारखान्याच्या अध्यक्षपदी भाजप नेत्या पंकजा मुंडे तर उपाध्यक्षपदी धनंजय मुंडे गटाच्या चंद्रकांत कराड यांची निवड करण्यात आली आहे. वैद्यनाथ सहकारी साखर कारखान्यावर गोपीनाथ मुंडे यांचं वर्चस्व होतं. मात्र, गोपीनाथ मुंडे यांच्या निधनानंतर या कारखान्याची जबाबदारी ही पंकजा मुंडे यांनी सांभाळली. पुन्हा एकदा वैद्यनाथ साखर कारखाना पांगरीची निवडणूक बिनविरोध पार पडली आहे. यात भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडे व राष्ट्रवादीचे नेते आमदार धनंजय मुंडे यांनी ही निवडणूक बिनविरोध केली.

### सात वर्षाच्या मुलीचा विनयभंग, रक्षकाला अटक

✔ **मुंबई** : कांदिवली पूर्व येथे ७ वर्षांच्या मुलीशी गेल्या वर्षभरापासून असभ्य वर्तन करणाऱ्या सुरक्षा रक्षकाला पोलिसांनी अटक केली. हा प्रकार कोणालाही सांगितल्यास गळा कापून टाकण्याची धमकी आरोपीने दिली होती. त्यामुळे मुलगी घाबरली होती. याप्रकरणी विनयभंग व बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या सोसायटीत काम करणारा ४५ वर्षीय सुरक्षा रक्षक गेल्या एक ते दीड वर्षांपासून पीडित मुलीला असभ्यरित्या स्पर्श करत होता. हा प्रकार पीडित मुलीने आईला सांगितल्यानंतर त्यांनी पोलिसाकडे तक्रार केली. पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल करुन सुरक्षा रक्षकाला अटक केली.

### मध्य रेल्वेला स्वत:च्याच मोहिमेचा विसर

✔ **मुंबई** : मध्य रेल्वेवरून दररोज लाखो प्रवासी प्रवास करतात. या गर्दीचे नियोजन करण्यासाठी मध्य रेल्वेकडून अनेक उपाययोजना, मोहिमा राबविल्या जातात. यामधील मध्य रेल्वेच्या रेल्वे सुरक्षा दलाद्वारे ‘माय लेफ्ट इज माय राइट..’ ही मोहीम सुरू केली. मात्र या मोहिमेचा विसर मध्य रेल्वेला झाल्याचे दिसून येत आहे. मध्य रेल्वेच्या दादर स्थानकात डाव्या बाजूने चढणारा सरकता जिना असणे आवश्यक असताना, उजव्या बाजूने चढणारा जिना आहे. त्यामुळे प्रवाशांमध्ये घोळ होत असून भविष्यात मोठा अपघात घडण्याची भीती आहे.

### वारजे भागात कोयता गँगची पुन्हा दहशत

✔ **पुणे** : शहरात कोयता गँगने उच्छाद मांडला आहे. कोयता गँगमधील सराईत गुन्हेगार हे वाहनांची तोडफोड करुन दहशत माजवित आहेत. वारजे भागात कोयता गँगने दहशत माजविली असून, खासदार सुप्रिया सुळे यांनी याबाबत पोलीस आयुक्त रितेश कुमार यांच्याशी चर्चा केली. या भागातील गुन्हेगारी रोखण्यासाठी गृहमंत्र्यांनी आदेश द्यावेत, अशी मागणी सुळे यांनी केली आहे. गेल्या काही महिन्यापासून पुणे शहर परिसरात नागरिकांच्या गाड्या फोडणे, धमकावून मारहाण करणे, दहशत माजविण्याचे प्रकार सुरु आहेत. वारजे भागात कोयता गँगने दहशत माजविली आहे. दहशतीच्या घटनांची दखल घेऊन खासदार सुप्रिया सुळे यांनी पोलीस आयुक्त रितेश कुमार यांच्याशी चर्चा केली.

### अभिनेत्री शांता तांबे यांचे निधन

✔ **कोल्हापूर** : मराठी चित्रपट सृष्टीतील ज्येष्ठ अभिनेत्री शांता तांबे यांचे सोमवारी निधन झाले. त्या ९० वर्षांच्या होत्या. त्यांची अभिनयाची कारकीर्द नाटकातून सुरू झाली. देश बंधू संगीत मंडळी च्या नाटकात त्यांनी अभिनय साकारला होता. आपल्या अभिनय कारकिर्दीत त्यांनी भालजी पेंढारकर, दिनकर पाटील, अनंत माने आदी ख्यातनाम दिग्दर्शकांसोबत त्यांनी काम केले. मोहित्याची मंजुळा, सवाल माझा ऐका, मोलकरीण, मर्दानी, बाई मोठी भाग्याची अशा नेक चित्रपटांमध्ये त्यांनी काम केले. घरची परिस्थिती प्रतिकूल असल्याने चित्रपटांमध्ये काम करण्यातचे ठरवले होते, असे त्या नेहमी सांगत असत.

### निवृत्त तिकीट तपासणीसाची शहापुरात हत्या

✔ **कल्याण** : आर्थिक व्यवहारातून कल्याण मधील एका निवृत्त तिकिट तपासणीसाची शहापूर तालुक्या तील धसई शिवनेर गावाच्या हद्दीत निर्घृण हत्या करण्यात आली आहे. शहापूर पोलिसांनी याप्रकरणी दोन जणांना अटक केली आहे. तिसऱ्या आरोपीचा शोध पोलिसांकडून सुरू आहे. गोपाळ रंग्या नायडू (६२, रा. चक्कीनाक, कल्याण पूर्व) असे हत्या झालेल्या निवृत्त तिकिट तपासणीसाचे नाव आहे. अरुण जगन्नाथ फर्डे (३२, रा. धसई, शहापूर), सोमनाथ रामदास जाधव (३५, रा. खडकपाडा, कल्याण), रमेश मोरे (रा. टिटवाळा) अशी आरोपींची नावे आहेत. अरुण, सोमनाथ यांना शहापूर पोलिसांनी अटक केली आहे.

### जलतरण तलावात पाण्याखाली योगासने

✔ **उरण** : आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्ताने सोमवारी दोन दिवस अगोदरच उरण नगरपरिषदेच्या जलतरण तलावात पाण्याखाली कुलकर्णी दाम्पत्याने १३ फूट खोल तलावात २२ मिनिटांत वेगवेगळ्या प्रकारची १२ आसने केली. या अनोखी उपक्रमात आनंद आल्याची माहिती विदुला कुलकर्णी यांनी दिली तसेच प्रथमच पाण्याखाली योगा करण्याचा प्रयत्न केल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. या २२ मिनिटांत उभ्याने पर्वतासन, त्रिकोणासन, वीर भद्रासन, नटराजासन व देव मुद्रा तर बैठक स्थितीत पर्वतासन, सिंहासन, भुजंगासन, सुलभासन, पद्मासन त्याचबरोबरीने श्लोक आणि ओंकार करण्यात आल्याची माहिती नौदलाचे निवृत्त कमांडो रवी कुलकर्णी यांनी दिली. यापूर्वी याच जलतरण तलावात देशाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त पाण्याखाली ध्वजारोहण व परेड केली होती.

### अपघातात टँकरचालकाचा मृत्यु

✔ **नाशिक** : मुंबई-आग्रा महामार्गावरील आडगाव शिवारात रस्त्यात उभ्या असलेल्या कंटेनरला इंधन टँकर धडकल्याने झालेल्या अपघातात गंभीर जखमी झालेल्या टँकर चालकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. भुपेश मगर (२७, झोडगे, मालेगाव) असे अपघातात मयत झालेल्या टँकर चालकाचे नाव आहे. शुक्रवारी रात्री साडेअकरा वाजता आडगाव शिवारातील नऊवा मैल परिसरात हा अपघात झाला होता. मगर हे इंधन टँकर घेऊन मालेगावहून मुंबईच्या दिशेने निघाले होते. गरवारे पेट्रोल पंप भागात रस्त्यावर उभ्या असलेल्या कंटेनरला इंधन टँकरने धडक दिली. टँकरचा पुढील भाग चेपल्याने त्यांना गंभीर दुखापत झाली होती.

### भुसावळ येथे तरुणाचा खून; संशयिताला अटक


✔ **जळगाव** : भुसावळ तालुक्यातील फेकरी येथील तरुणाचा दुचाकीवरून ढकलून दिल्याने डोक्याला मुका मार लागल्याने जागीच मृत्यू झाला. फेकरी उड्डाणपुलाजवळील साकरी समांतर रस्त्यावर ही घटना घडली. याप्रकरणी भुसावळ तालुका पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, संशयिताला अटक करण्यात आली आहे. मंगल शेळके (२३, फेकरी, ता. भुसावळ) असे मृताचे नाव आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, मंगल याच्याशी पूर्ववैमनस्यातून राहुल पाडळे (२८) याचा वाद झाला. त्यावेळी दोघांमध्ये झटापटही झाली. राहुलने मंगलची कॉलर पकडून शिवीगाळ केली. त्याला दुचाकीवर जबरदस्तीने बसवीत जोराने ढकलून दिले. त्यात तो फेकरी उड्डाणपुलाखाली पडल्याने डोक्याला मुका मार लागला. त्यात त्याचा जागीच मृत्यू झाला.

# मनिषा कायंदेंचा शिंदे गटात प्रवेश; ठाकरे गटाचे संख्याबळ घसरले

## राष्ट्रवादी काँग्रेस करणार विरोधी पक्षनेतेपदाचा दावा

✔ सुराज्य/मुंबई

विधान परिषदेच्या आमदार आणि ठाकरे गटाच्या प्रवक्त्या मनिषा कायंदे यांनी रविवारी (१८ जून) शिवसेनेच्या शिंदे गटात प्रवेश केला. वर्षभरापूर्वी ३९ आमदारांना बरोबर घेऊन एकनाथ शिंदे यांनी वेगळा गट स्थापन केला. परिणामी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचं सरकार कोसळलं आणि उद्धव ठाकरे यांचं मुख्यमंत्रीपद गेलं. परंतु विधान परिषदेत ठाकरे गट हा भारतीय जनता पार्टीनंतरचा दुसरा सर्वात मोठा पक्ष होता. ठाकरे गटाकडे १० आमदार होते. त्यामुळे टाकरे गटाकडे विधान परिषदेचं विरोधी पक्षनेते पद होतं. ठाकरे गटाचे नेते आणि आमदार अंबादास दानवे सध्या विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते आहेत.



विधान परिषदेत ठाकरे गटाकडे १० तर शिंदे गटाकडे एक आमदार होता. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे ९ आमदार होते. दरम्यान, कायंदे यांनी ठाकरे गटाला रामराम केल्यामुळे आता विधान परिषदेत ठाकरे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोन्ही पक्षांकडे प्रत्येकी ९ आमदार आहेत.

सध्या विधानसभेचे विरोधी पक्षनेतेपद राष्ट्रवादी काँग्रेसकडे आहे. तर विधान परिषदेचं विरोधी पक्षनेतेपद ठाकरे गटाकडे आहे. परंतु मनीषा कायंदे यांच्या जाण्याने ठाकरे गटाचं विधान परिषदेतलं संख्याबळ कमी झालं आहे. त्यामुळे प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींनी काही वेळापूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसचे वरिष्ठ नेते आणि विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांना प्रश्न विचारला की, आता राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष विधान परिषदेच्या विरोधी पक्षनेतेपदावर दावा करणार का? यावर अजित पवार स्मितहास्य करत म्हणाले, तुम्ही हे आमच्या लक्षात आणून दिल्यामुळे आम्ही निश्चितपणे यावर विचार करू.

अजित पवार म्हणाले, ‘आमची राष्ट्रवादीची बैठक आधीच ठरली आहे. जयंत पाटील आणि मी फार आधीच ती ठरवली आहे. या बैठकीचा आणि विधान परिषदेच्या विरोधी पक्षनेतेपदाचा कसलाही संबंध नाही. राष्ट्रवादी काँग्रेसच्या वर्धापन दिनानिमित्त आम्ही ९ जूनला जी सभा घेणार होतो, ती पावसामुळे घेता आली नाही. ती निमंत्रितांची सभा २१ जूनला आयोजित केली आहे. स्वत: पवारसाहेबांनी ती सभा ठेवली आहे.’


▶ धक्कादायक

# खेळता खेळता कार झाली लॉक, तीन चिमुकल्यांचा दुर्दैवी मृत्यू

✔ सुराज्य/नागपूर

पाचपावली पोलीस ठाण्याच्या हद्दीतील टेका नाका परिसरातून सहा वर्षे वयोगटातील दोन मुले आणि एक मुलगी बेपत्ता झाले होते. दरम्यान या मुलांचे एका चारचाकी वाहनात मृतदेह सापडले आहेत. एकाच वेळी तीन चिमुकल्यांचा मृत्यू झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

शनिवारी सायंकाळी सहा वर्षे वयोगटातील तीनही मुले टेका नाकाजवळील फारुख मैदानावर खेळत होते. रात्र झाली तरी घरी न परतल्याने त्यांच्या पालकांनी पोलिसांत धाव घेतली. पोलिसांनी लगेच त्या भागातील उपलब्ध सीसीटीव्ही कॅमेऱ्यातील फुटेज तपासले. परंतु, मुलांचा छडा लागला नाही.



या मुलांचे मृतदेह फारुख नगर येथील मैदानात पार्क केलेल्या एका जुन्या कारमध्ये सापडले. ही मुलं त्या कारमध्ये खेळत होती. खेळता खेळता ही मुलं गाडीमध्ये लॉक झाली. त्यामुळे त्यांना बाहेर पडणं मुश्किल झालं. या मुलांचा गुदमरून आणि उष्णतेमुळे मृत्यू झाला, अशी माहिती पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी एका खाजगी वृत्तसंस्थेला दिली.

मृत झालेल्या मुलांमध्ये दोन भावंडे आणि त्यांची एक मैत्रीण होती. एकाच वेळी परिसरातील तीन लहान मुलांचा मृत्यू झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. शनिवारी सायंकाळपासून ही मुलं सापडत नव्हती.

सर्वत्र शोध घेतल्यानंतरही त्यांचा शोध लागला नसल्याने त्यांचं अपहरण झाला असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला होता. परंतु नंतर एका कारमध्ये त्यांचा मृतदेह सापडला. यामुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

# वेठबिगारीचा धक्कादायक प्रकार मजुरांना साखळदंडाने जखडले

✔ **सुराज्य/धाराशीव** : गुलामगिरीच्या काळात गुलामांना ज्या प्रकारची वागणूक दिली जात होती, अगदी त्याच प्रकारची वागणूक काही मजुरांना देण्यात आली असल्याची घटना उघडकीस आली आहे. धाराशिवमध्ये हा धक्कादायक प्रकार घडला आहे. या प्रकरणी ११ जणांची सुटका करण्यात आली आहे. पूर्वीच्या काळात मजुरांनी काम चुकारपणा करू नये, त्यांनी त्यांच्या कामाच्या ठिकाणाहून पळ काढू नये, यासाठी त्यांना साखळदंडाने जखडून ठेवले जायचे. पण हळूहळू हा प्रकार पूर्णत: नाहीसा झाल्याचे पाहायला मिळाले. परंतु वेठबिगारी हा प्रकार नष्ट झाला नसून महाराष्ट्राच्या काही भागात अजूनही सुरू असल्याची माहिती समोर आली आहे.

# राज्यात माहिती आयोगाकडे ११ हजार प्रकरणाचा डोंगर

✔ **सुराज्य/नाशिक** : राज्य माहिती आयोगात तक्रारींचा ओघ प्रचंड वाढला आहे. मात्र, सद्यस्थितीत खंडपीठाकडे अकरा हजार प्रकरणे प्रलंबित असल्याचे चित्र आहे.

कोरोना काळात प्रकरणे निकाली काढण्याची प्रक्रिया काही काळ बंद होती. बराच काळ आयोगाला पूर्णवेळ आयुक्त नसल्याने प्रलंबित प्रकरणांचा आकडा वाढल आहे. राज्यात माहिती आयोगाची चार खंडपीठे आहे. त्यापैकी एक खंडपीठ नाशिकला असून, त्या अंतर्गत नाशिक, धुळे, जळगाव, अहमदनगर आणि नंदुबार जिल्ह्यांतील प्रकरणे दाखल होत असतात. गेल्या तीन वर्षांत या पाचही जिल्ह्यांतून दाखल होणाऱ्या तक्रारींची संख्या वाढली आहे.

सद्यस्थितीला वर्षभरात द्वितीय अपील म्हणून अडीच ते तीन हजार प्रकरणे खंडपीठात दाखल होत असतात. त्यावर सुनावणी होऊन ही प्रकरणे निकाली काढली जातात. सध्या आयोगात दररोज ४० ते ६०, तर महिन्याला सुमारे ५०० प्रकरणे निकाली निघतात. मात्र, खंडपीठाकडे अपिले दाखल होण्यापासून ती निकाली निघण्यापर्यंतची प्रक्रिया बरीच किचकट असते. आयुक्तांनी दिलेल्या निकालांचे डिक्टेशन घेऊन ते टाइप करून संबंधितांना टपालाने पाठवावे लागतात व वेबसाइटवर अपलोड करावे लागते.

याशिवाय दंडात्मक कारवाई, पाठपुराव्याची पत्रे, बजेट, हजेरी आदी कामेही असतात. दोन महिन्यांपूर्वी नाशिकला पूर्णवेळ आयुक्तांची नियुक्ती केलेली आहे. मात्र, त्यांच्याकडेही कोकण विभागाची प्रभारी जबाबदारी देण्यात आली आहे. त्यामुळे प्रकरणे निकाली काढण्याची प्रक्रिया मंदावल्याने दोन वर्षांतील प्रलंबित प्रकरणांची संख्या अकरा हजारांवर गेली आहे.

▶ धक्कादायक

# एमपीएससी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या दर्शनाचा मृतदेह राजगडाच्या पायथ्याशी आढळला

✔ सुराज्य/पुणे

पुणे जिल्ह्यातील वेल्हे तालुक्यातील राजगड किल्ल्याजवळ महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण केलेल्या तरुणीचा मृतदेह आढळून आला आहे. तिने एमपीएससीतून राज्य वन सेवेची परीक्षा उत्तीर्ण केली होती. प्रशासकिय सेवेत रुजू होण्यापूर्वी तिचा करुण अंत झाला आहे. दर्शना दत्तू पवार (वय २६, रा. अहमदनगर जिल्ह्यातील कोपरगाव) असं मृत तरुणीचं नाव आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत दर्शना पवार गेल्या काही वर्षांपासून स्पर्धा परीक्षेची तयारी करत होती. अभ्यासासाठी ती अनेकदा पुण्यात येत होती. तिने नुकतीच ‘रेंज फॉरेस्ट ऑफिसर’ या पदासाठीची परीक्षा उत्तीर्ण केली. तिने मिळवलेल्या यशाबद्दल पुण्यातील खासगी अकादमीने ११ जून रोजी तिच्या सत्काराचा कार्यक्रम आयोजित केला होता. यानिमित्त दर्शना ९ जून रोजी पुण्यात आली होती. दरम्यान, ती पुण्यातील नर्हे परिसरात आपल्या मैत्रिणीबरोबर राहत होती. १२ जून रोजी मैत्रिणीबरोबर सिंहगड किल्ल्यावर जात असल्याचं दर्शनाने आपल्या घरच्यांना सांगितलं. मात्र, १२ जूनपासून दर्शना आणि तिची मैत्रीण दोघींच्याही फोनवर संपर्क होत नव्हता. त्यांचा शोध न लागल्याने दोघींच्या कुटुंबीयांनी पुणे शहर पोलिसांकडे बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल केली. दर्शना आणि तिच्या मैत्रिणीच्या बेपत्ता झाल्याची तक्रार अनुक्रमे सिंहगड आणि वारजे पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली. चौकशी सुरू केली असता त्यांचे शेवटचे फोन कॉल लोकेशन वेल्ह्यात सापडले. रविवारी दर्शनाचा मोबाईल वेल्ह्यातील राजगड किल्ल्याच्या पायथ्याशी सापडला, त्यानंतर तिचा मृतदेहही सापडला आहे.

राजगड किल्ल्याजवळ सापडलेला मृतदेह दर्शना पवारचा असल्याची पुष्टी करण्यात आली आहे. पुणे ग्रामीण पोलिसांच्या वेल्हा पोलीस ठाण्यातील पोलिसांनी दर्शनाचा मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयात नेला असून आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. दर्शनाचा मृतदेह अर्धवट कुजलेल्या अवस्थेत सापडल्याचे पोलिसांनी सांगितलं. दर्शनाच्या मृत्यूचे कारण शोधण्यासाठी पोलिसांच्या पथकाने तपास सुरू केला आहे. तसेच पुणे शहर आणि पुणे ग्रामीण पोलिसांचं पथक अद्याप बेपत्ता असलेल्या तिच्या मैत्रिणीचा शोध घेत आहेत.

### दुर्दैवी आणि खेदजनक घटना : सुप्रिया सुळे

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी या घटनेची दखल घेतली आहे. या संपूर्ण मृत्यूप्रकरणात योग्य दिशेनं तपास करून दर्शनाला न्याय द्यावा, अशी मागणी सुप्रिया सुळेंनी केली. सुप्रिया सुळे ट्विटमध्ये म्हणाल्या, ‘एमपीएससीच्या परीक्षेत यश मिळविलेल्या दर्शना पवार या मुलीचा मृतदेह किल्ले राजगडाच्या पायथ्याशी सापडला. ही घटना अतिशय दुर्दैवी आहे. प्रशासकीय सेवेत रुजू होण्यापूर्वी ही घटना घडली, हे अतिशय खेदजनक आहे. या संपूर्ण प्रकरणाचा पुणे ग्रामीण पोलीसांनी योग्य दिशेने तपास करुन दर्शनाला न्याय द्यावा.’

# मान्सूनच्या मोसमात उष्णतेची लाट

✔ सुराज्य/नागपूर



हवामानातील बदलांचा वेग गेल्या काही वर्षात वाढला असला तरीही यावर्षी हे बदल अधिक तीव्र झाले आहेत. भर उन्हाळ्यात वादळीवारे आणि गारपिटीसह झालेला अवकाळी पाऊस आणि त्यानंतर मान्सूनची वेळ असताना तापलेले उन्ह, यामुळे नागरिकही हैराण झाले आहेत. लवकर येणार म्हणत असतानाच मान्सूनचे आगमन भारतात उशीरा झाले आणि महाराष्ट्राची वेस ओलांडलेला मान्सून या वेशीवरच अडकला आहे.

२४ जूनला मान्सून पुण्यात प्रवेश करेल आणि पुण्याच्या घाटमाथ्यावर मुसळधार पाऊस होईल. तर २६ जूनपासून पुण्यात पावसाचा जोर वाढेल, असा नवा अंदाज हवामान खात्याने दिला आहे. तर इकडे विदर्भात उष्णतेचा दाह काही कमी होण्याचे नावच घेत नाही. महाराष्ट्रातील विदर्भासह छत्तीसगढ, झारखंड, ओडिशा, तेलंगणा या देशातील काही भागांमध्येही आणखी काही दिवस उष्णतेचे प्रमाण वाढलेले असेल.

सोमवारी आणि आज राजस्थानमध्ये मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. तर मध्यप्रदेश आणि उत्तर प्रदेशातही अशीच काहीशी परिस्थिती पाहायला मिळू शकते. गुजरातच्याही काही भागांमध्ये तुरळक ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडू शकतो. यंदा ऐन मान्सूनच्या मोसमात उष्णतेची लाट असल्याने हवामान खात्याने ‘येलो’ व ‘ऑरेंज’ अलर्ट दिला आहे. दक्षिण भारतात ढगांच्या गडगडाटासह पावसाचा अंदाज दिला आहे. तर देशाच्या उत्तरेकडील हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, जम्मू-काश्मिर भागात पावसाची हजेरी व बर्फवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे.

# जिल्हा प्रशासनामध्ये मोठी खांदेपालट

## ५४ अव्वल कारकून, ६२ महसूल सहाय्यक, २८ मंडल अधिकारी, सहा स्पेस चालकांच्या बदल्या

सुराज्य/सोलापूर

सोलापूर जिल्हा प्रशासनामध्ये अंतर्गत मोठी खांदेपालट करण्यात आली आहे. तब्बल ५४ अव्वल कारकून, ६२ महसूल सहाय्यक आणि २८ मंडळ अधिकारी आणि सहा चालकांच्या अंतर्गत बदल्या केल्या आहेत. काही जणांना प्रमोशन मिळाले तर काही जणांची रिक्त जागी नियुक्ती केली आहे. काही कर्मचाऱ्यांना आहे त्या जागी मुदत वाढ देण्यात आली आहे.




जिल्हा प्रशासनामध्ये ३१ मे पर्यंत या बदल्या अपेक्षित असतात मत्र यंदाच्या वर्षी ३० जूनपर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. त्याची यादी आज जिल्हा प्रशासनाने जाहीर केली आहे. आज बदल्या झालेल्या कर्मचाऱ्यांमध्ये ५४ अव्वल कारकून आहेत ६२ महसूल सहाय्यक आहेत तर सहा चालक आहेत आणि २८ मंडल अधिकाऱ्यांचा समावेश आहे

बार्शीचे मंडल अधिकारी उमेश डोईफोडे यांची सौंदरे येथे नव्याने पद निर्माण केलेल्या मंडलाधिकारी पदावर नियुक्ती झाली आहे. जिल्ह्यातील कार्यालयातील करमणूक शाखेतील शोभना चव्हाण यांची पुनर्वसन शाखेत नागटिळक यांच्या बदलीने रिक्त झालेल्या मंडल अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे. टेंभुर्णीच्या मंडल अधिकारी मनीषा लकडे यांची देखील करमणूक शाखेत दळवे यांच्या रिक्त जागी नियुक्ती केली आहे.

माढा तालुक्यातील लऊळ येथील मंडल अधिकारी सुजित शेळवणे यांची टेंभुर्णी येथे मंडल अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे. पंढरपूर तालुक्यातील चळेच्या मंडल अधिकारी संतोष सुरवसे यांची पुळुज येथे मंडल अधिकारी म्हणून नियुक्ती झाली आहे. पेनुरच्या मंडल अधिकारी सारिका वाव्हाळ यांची सोलापुरातील कसबेच्या मंडल अधिकारी म्हणून नियुक्ती झाली आहे. वाघोलीच्या मंडलाधिकारी ज्ञानोबा माळी यांची बोरामणीच्या धनुरे यांच्या बदलीने रिक्त झालेल्या जागेवर नियुक्ती झाली आहे. उप जिल्हाधिकारी भूसंपादन एक विभागातील मंडळ अधिकारी गजानन जाधव यांची द. सोलापुरातील विंचूर या गावी मंडल अधिकारी म्हणून नियुक्ती झाली आहे.

वागदरीच्या मंडल अधिकारी संतोष कांबळे यांची बाळे येथे मंडल अधिकारी म्हणून नियुक्ती झाली आहे. मोहोळ तहसील कार्यालयातील अव्वल कारकून कलावती कोटे यांची मोहोळ तालुक्यातील वाघोली येथे तर करमाळ्यातील तहसील कार्यालयातील अव्वल कारकून अनिल ठाकर यांची करमाळा तालुक्यातील जेऊर येथे मंडळ अधिकारी म्हणून नियुक्ती झाली आहे.

सांगोला तील मंडळ अधिकारी रवींद्र ननवरे यांची माळशिरस तालुक्यातील फोंडशिरसचे मंडल अधिकारी म्हणून नियुक्ती झाली आहे. पंढरपूर तालुक्यातील भंडीशेगावचे मंडळ अधिकारी दीपक शिंदे यांची पंढरपूर तालुक्यात चळे या ठिकाणी एस. आर. सुरवसे यांच्या बदलीने रिक्त झालेल्या मंडलाधिकारी पदावर नियुक्ती झाली आहे. करमाळात तालुक्यातील अर्जुन नगरचे मंडल अधिकारी सादिक काजी यांची करमाळा तालुक्यामध्ये बदली झाली आहे.

सांगोला तालुक्यातील महुदचे अधिकारी दिनेश भंडगे यांची पंढरपूर तालुक्यातील भंडीशेगावचे मंडळ अधिकारी व्हि.डी. शिंदे यांच्या बदलीने रिक्त झालेल्या जागेवर नियुक्ती झाली आहे. विंचूरचे मंडल अधिकारी संतोष फुलारी यांची उत्तर सोलापूर तालुक्यातील सिटी सर्वे विभागात मंडळ अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे. जेऊरचे मंडल अधिकारी रेवन्नाथ वळेकर यांची अर्जुन नगरचे मंडल अधिकारी म्हणून नियुक्ती झाली आहे.

भोसेचे मंडल अधिकारी नागनाथ चौध यांची करमाळा तहसील विभागात रोहिओ विभागात बदली झाली आहे. नातेपुते विभागाचे मंडल अधिकारी संदीप चव्हाण यांची वेळापूरचे मंडळ अधिकारी म्हणून नियुक्ती झाली आहे. पुनर्वसन विभागातील मंडळ अधिकारी बालाजी नागटिळक यांची अनगर मंडल अधिकारीपदी नियुक्ती झाली आहे. माळशिरस तालुक्यातील पिलिव मंडल अधिकारी शेखर तपासे यांची तहसील पंढरपूरातील कुळ कायदा विभागाचे अव्वल कारकून म्हणून नियुक्ती झाली आहे. करमाळा तहसील कार्यालयातील रोहयो विभागाचे अव्वल कारकून संतोष गोसावी यांची करमाळा तालुक्यातील जिंती येथे मंडळ अधिकारी म्हणून नियुक्ती झाली आहे. चपळगावचे मंडल अधिकारी राजकुमार कोळी यांना आहे त्या पदावर एक वर्षाची मुदतवाढ दिली आहे जिल्हाधिकारी कार्यालयातील कमरमणूक शाखेतील अव्वल कारकून राजेंद्र बारगजे यांना देखील एक वर्षाची मुदतवाढ देण्यात आली आहे. मंगळवेढा तालुक्यातील आंधळगावचे मंडल सोमनाथ जाधव यांची पेनुर येथे मंडल अधिकारी म्हणून नियुक्ती झाली आहे. सांगोला तालुक्यातील संगेवाडीचे मंडळ अधिकारी बाळू कदम यांची पंढरपूर तालुक्यातील रोपळेच्या मंडल अधिकारी पदी नियुक्ती केली आहे तसेच पुळूजचे मंडल अधिकारी गणेश तिके यांची सांगोला तालुक्यातील कोळा येथे मंडल अधिकारी म्हणून नियुक्ती झाली आहे. जिल्हाधिकारी कार्यालयातील कमरमणूक शाखेतील अव्वल कारकून तुकाराम कोळी यांच यांची उपजिल्हाधिकारी भूसंपादन एक कार्यालयात मंडल अधिकारी म्हणून नियुक्ती झाली आहे.



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे प्र.कुलगुरु डॉ.रजनीश कामत यांनी सुराज्यला सदिच्छा भेट दिली. त्यावेळी त्यांचे स्वागत संपादक राकेश टोळ्ये, व्यवस्थापकीय संपादक रोनित टोळ्ये यांनी केले. यावेळी कार्यकारी संपादक शंकर जाधव सोबत प्रा.डॉ.रवींद्र चिंचोळकर.

# देवेंद्र फडणवीस ठरवणार माढा लोकसभेची रणनिती

## दोन दिवस माण-फलटण दौऱ्यावर

सुराज्य/सोलापूर

राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे येत्या बुधवार (दि. २१ ) व गुरूवारी (दि. २२) सातारा जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. भाजपच्या बुथ प्रमुखांच्या संमेलनाला मार्गदर्शन करणार असून माढा आणि सातारा लोकसभा मतदारसंघाच्या कोअर कमिटीची बैठक घेणार आहेत.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळाला ९ वर्ष पूर्ण झाल्याबद्दल भाजपतर्फे महासंपर्क अभियान राबवण्यात येत आहे. त्यापार्श्वभूमीवर नेते, मंत्र्यांना लोकसभा आणि विधानसभा निहाय दौरे करण्याचे आदेश देण्यात आले आहे. त्याचाच एक भाग म्हणून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दोन दिवस सातारा जिल्हा दौऱ्यावर आहेत. माण, फलटण या दोन्ही मतदारसंघात त्यांचे विविध कार्यक्रम होणार आहेत.

हे दोन्ही मतदारसंघ माढा लोकसभा मतदारसंघात येतात. त्यामुळे या दौऱ्यात फडणवीस माढा लोकसभेची रणनिती आखून पदाधिकाऱ्यांना सूचना देतील, असे बोलले जात आहे. सध्या माढा लोकसभा मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व रणजितसिंह निंबाळकर करत आहेत. लोकसभा निवडणुका दहा महिन्यांवर येऊन ठेपल्या आहेत. गतवेळी माढा लोकसभा मतदारसंघ फडणवीस यांनी प्रतिष्ठेचा केला होता. सर्व नेत्यांना एकत्र आणत फडणवीस यांनी हा राष्ट्रवादी बालेकिल्ला भाजपच्या ताब्यात खेचून आणला होता. आता हा मतदारसंघ पुन्हा भाजपच्याच ताब्यात रहावा म्हणून भाजप प्रयत्नशिल आहे. त्यादृष्टींने तयारीचा पहिला टप्पा म्हणून फडणवीस यांच्या या दौऱ्याकडे पाहिले जात आहे. या संपूर्ण दौऱ्यात खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर, आमदार शिवेंद्रराजे भोसले, गोपीचंद पडळकर, महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील उपस्थित राहणार आहेत.

### असा असेल दौरा

फलटण तालुक्यातील बरड येथे माऊलींची पालखी आहे. तेथेते पालखीचे दर्शन फडणवीस घेणार आहेत. त्यानंतर माण तालुक्यातील दहिवडी येथे पाणी पुरवठा योजनेचे भूमिपूजन त्यांच्या हस्ते होईल. ही योजना जिहे- कटापूर उपसा सिंचन योजनेतून ३२ गावांसाठी पाणी देणारी आहे. त्यानंतर सायंकाळी सहा वाजता तेथेच जाहीर सभा होईल. सायंकाळी माढा लोकसभा मतदारसंघाच्या कोअर कमिटीची बैठक होणार आहे.

# मृत्यूस कारणीभूत ट्रकचालकावर गुन्हा

बार्शी : बार्शी-सोलापूर रस्त्यावर शनिवारी रात्री झालेल्या अपघातात मोटारसायकलवरील दोघांचा जागीच मृत्यू झाला होता. याप्रकरणी ट्रकचालकावर बार्शी शहर पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. मल्हारी बजरंग आडके (वय ३८ रा. पानगांव ता. बार्शी) असे ट्रकचालकाचे नांव आहे. दडशिंगे येथील नारायण घोलप तसेच काशिनाथ नरूटे हे दोघे मोटारसायकलवरून गावाकडे निघाले होते. धोरओढयाच्या जवळ हा अपघात झाला. ट्रकची मोटारसायकलला जोराची धडक बसल्याने झालेल्या अपघातात दोघे जागीच ठार झाले होते. दोघांच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी ट्रकचालकावर गुन्हा दाखल करण्यात आला. बालाजी नरूटे यांनी फिर्याद दिली.

# एकीकडे शहरात विमानसेवेची चर्चा दुसरीकडे परिवहन कर्मचारी काढणार मोर्चा



सुराज्य/सोलापूर

सिध्देश्वर सहकारी साखर कारखान्याची चिमणी पाडल्यानंतर सोलापुरात विमानसेवेची चर्चा सुरू झाली आहे तर दुसरीकडे शहरात महापालिकेची परिवहन व्यवस्था मोडकळीस आली आहे. परिवहनच्या सेवानिवृत्त कामगारांनी सोमवारी थकीत वेतनासाठी आंदोलन केले. मागण्या मान्य न झाल्यास मोर्चा काढण्याचा इशाराही त्यांनी आयुक्तांना निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

महापालिकेच्या परिवहन उपक्रमातील ५० हून अधिक कामगार सोमवारी सायंकाळी लाल बावटा महानगरपालिका युनियनच्या नेतृत्वाखाली एकत्र आले. व्यंकटेश कोंगारी यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने महापालिका आयुक्त शितल तेली उगले यांना निवेदन दिले. परिवहन कर्मचारी व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सावा वेतन आयोग लागु करावा, परिवहन उपक्रमाकडे सन १९८४, १९८७, १९८८, १९९० १९९२ पासून बदली सेवा करुन सन २००९ ते २०१५ या कालावधीमध्ये कायम झालेल्या कार्यरत व कायम सेवा पूर्ण करुन नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना निवृत्ती वेतन मिळावे यासह विविध मागण्या करण्यात आल्या. मागण्यांची पूर्तता न केल्यास आडम मास्तर यांच्या नेतृत्वात २६ जून रोजी महापालिकेकेवर मोर्चा काढण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला. यावेळी तौफिक शेख, सुरेश बागलकोट, कॉ. अयुब शेख, कॉं. सतीश दाभाडे, कॉ. महिबुब शेख, कॉ. अंबादास हुच्चे, कॉ. आसिफ लालकोट आदींचा समावेश होता.



### परिवहन कर्मचाऱ्यांवर अन्याय का? : कोंगारी

महापालिकेच्या परिवहन विभागातून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना निवृत्ती वेतन मिळवण्यासाठी प्रचंड ओढाताण करावी लागत आहे. महानगरपालिका अधिकारी, कर्मचाऱ्यांना १ जानेवारी पासून सातवा वेतन आयोग लागू करणे आला आहे. मात्र परिवहच्या कर्मचाऱ्यांना व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना ७ वा वेतन आयोग लागू करण्यात आलेला नाही. ही बाब समस्त परिवहन कर्मचाऱ्यांवर अन्याय करणारी आहे, असे व्यंकटेश कोंगारी यांनी म्हटले आहे.

# तरुणास लोखंडी फायटरने मारहाण; चौघांवर गुन्हा

सोलापूर : तरुणास लाथाबुक्क्यांनी मारहाण करत लोखंडी फायटरने मारहाण करून गंभीर दुखापत केल्याप्रकरणी चार जणांविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना २० मे २०२३ रोजी कल्पना नगर येथे घडली.याप्रकरणी तौफिक मदार शेख (वय-२३,रा. कल्पना नगर) याने एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्याच्या फिर्यादीवरून फैजल मुल्ला व त्याच्यासोबत असलेले अनोळखी तीन इसम यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. फैजल मुल्ला याने अचानक फिर्यादी तौफिक याला तुझ्याशी बोलायचे आहे असे म्हणून घराबाहेर बोलवले.त्यानंतर त्याने आई-वडील आते भाऊ फिरोज शेख व आत्या मुमताज शेख या सर्वांना हाताने मारहाण केले.त्यानंतर त्याच्यासोबत असणाऱ्या एका इसमाने तौफिकला लोखंडी फायटरने मारले. या घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक कुकडे हे करीत आहेत.

# अज्ञात चोरट्याने ४० हजारांचा ऐवज पळवला; गुन्हा दाखल

सोलापूर : अज्ञात चोरट्याने ४० हजार रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. फिर्यादी प्रसन्न नागनाथ ईश्वरकट्टी (वय-२१,रा.साठे-पाटील वस्ती जुना देगाव नाका) यांचा दोन मोबाईल,एटीएम कार्ड, पॅन कार्ड,आधार कार्ड,वाहनांचे लायसन व पासबुक असा वीस हजार रुपये किमतीचा ऐवज चोरून नेला. तसेच त्यांच्या घराशेजारी राहणारे ओळखींचे अक्षय टेळे यांच्या घरातील १७ हजार रुपये किमतीचा मोबाईल,दोन हजार रुपये रोख रक्कम,पाचशे रुपये किमतीचा छोटा मोबाईल व तसेच एटीएम,आधार कार्ड,पॅन कार्ड,वाहन परवाना असा मिळून १९ हजार पाचशे रुपयांचा ऐवज चोरून नेला आहे.ही घटना १८ जून रोजी रात्री साठे पाटील वस्ती येथे घडली. याप्रकरणी प्रसन्न ईश्वरकट्टी यांनी सलगर वस्ती पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे,घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल गायकवाड हे करीत आहेत.




# शिवीगाळ करत डोक्यात घातला दगड

सोलापूर : माझ्या बायकोला का घेऊन गेलास असे म्हणत शिवीगाळ करत डोक्यात दगड घातल्याची घटना उघडकीस आली आहे.ही घटना १६ जून रोजी दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास महिला सुरक्षा ऑफिस, सहाय्यक पोलीस आयुक्त ऑफिसच्या मागील कच्च्या रस्त्यावर घडली. राजेंद्र हिराचंद्र कट्टे (वय-३३,रा. विरवडे) यांचे भाऊजी विजय भस्मे (रा.हत्तुरे वस्ती) याने राजेंद्र यास माझ्या बायकोला का घेऊन गेलास असे म्हणून भाषेत शिवीगाळ करून तुला बघून घेतो अशी दमदाटी केली.त्यानंतर त्यास मारहाण केली. राजेंद्र कट्टे यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. विजय भस्मे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. तपास पोलीस नाईक माडे हे करीत आहेत.

# चोरट्याने ट्रक मधील बॅटरी पळवली


सोलापूर : सिध्देश्वर पेठ शहापूर चाळ येथे पार्क करून ठेवलेला ट्रक क्रमांक एम.एच.१३.सीयू.५०३९ यातील चोरून नेली आहे.ही घटना दि.१३ ते १४ जून दरम्यान घडली.याप्रकरणी अखिल इस्माईल शेख (वय-४४,रा.सिध्देश्वर पेठ) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक काळेल हे करीत आहेत.

# गजानन महाराजांच्या पालखीचे उद्या जिल्ह्यात आगमन

सुराज्य/सोलापूर

वैष्णव पताका हाती घेऊन संत गजानन महाराज पालखी बुलढाण्यातून काही दिवसांपूर्वी विठ्ठलाच्या भेटीसाठी रवाना झाली आहे. हाच पालखी सोहळा येत्या २१ जून रोजी सकाळी ९ वाजता सोलापूर जिल्ह्यात दाखल होणार आहे.

बुधवारी पालखीचे उळे (ता. दक्षिण सोलापूर) येथे आगमन होणार असून तेथेच मुक्काम होणार आहे. गुरूवार २२ जून २०२३ रोजी सकाळी ९ वाजता पालखीचे आगमन सोलापूर शहरातील पाणी गिरणी चौकात होणार आहे. तेथे स्वागत झाल्यानंतर पालखी सोहळा - तुळजापूर वेस - कस्तुरबा मार्केट - सम्राट चौक - श्री सदगुरु प्रभाकर स्वामी महाराज मंदिर येथे दुपारी १२ वाजता भोजन व विश्रांती करणार आहे. त्यानंतर दुपारी २ वाजता सम्राट चौक - बाळीवेस - चाटी गल्ली - भुसार गल्ली - कुंभार वेस - कन्नाचौक - राजेंद्र चौक मार्गे कुचन प्रशाला येथे सायंकाळी ५ वाजता आगमन व मुक्कामासाठी थांबणार आहे. शुक्रवार २३ जून २०२३ रोजी हा पालखी सोहळा कुचन प्रशालेतून सकाळी ६ वाजता पालखीस सुरूवात होवून पालखी जोडबसवण्णा चौक- पद्मशाली चौक- सिव्हील हॉस्पीटल - बेडर पूल - नळ बझार - जगदंबा चौक - लष्कर - सात रस्तामार्गे उपलप मंगल कार्यालय येथे सकाळी १० ते ११ दरम्यान आगमन करणार आहे. शनिवार २४ जून रोजी सकाळी ६ वाजता उपलप मंगल कार्यालयापासून पालखी मोदी पोलीस चौकी - जुना एम्प्लायमेंट चौक- डफरीन चौक- पार्क चौक - रामलाल चौक- भैया चौकमार्गे दमाणी नगर येथे सकाळी ११ वाजता आगमन व भोजन करून हा पालखी सोहळा तिहै मार्गे पंढरपुरसाठी प्रस्थान होणार आहे.



# डॉ.नीलम गोऱ्हे आज सोलापुरात

सोलापूर : विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे मंगळवारी सोलापूर दौऱ्यांवर येणार आहेत. मंगळवारी सकाळी सोलापूरात दाखल होणार आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात पंढरपुर विकास आरखडा आणि आषढी वारी नियोजनाचा आढवा बैठक घेणार आहेत.



मंगळवारी दुपारी १२.३० वाजता सोलापूर येथे आगमन, दुपारी २.३० वाजता नूतन जिल्हाधिकारी कार्यालयात वारी प्रशासकिय नियोजन व पंढरपूर विकास आराखडा आढावा बैठक. या बैठकिस जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांसह अधिकारी उपस्थित राहणार आहेत. दुपारी साडेचार वाजता अक्कलकोट रोड, ओंकार पार्क येथे शिवसेना महिला आघाडी व अस्मिता कृषी पर्यटन संचलित महिला गृह उद्योग यांच्या संयुक्त विद्यमाने प्रशिक्षण शिबिर कार्यक्रमास उपस्थिती. साडेपाच वाजता शासकिय विश्रामगृहात महिला शिवसेना पदाधिकारी आणि शिवसेना पदाधिकाऱ्यांशी संवाद, साडेसहा वाजता पत्रकार परिषद आणि रात्री मुक्काम. बुधवारी सकाळी साडेआठला पंढरपुरकडे प्रयाण.

# हरिभाईच्या मैदानावर उद्या योग दिन साजरा होणार

### मानवतेसाठी योग यंदाची थीम : सुधा अळ्ळीमोरे

सुराज्य/सोलापूर



जगभरात दरवर्षी २१ जूनला योग दिवस साजरा केला जातो. सोलापुरातील हरीभाई देवकरण प्रशालेच्या मैदानावर बुधवार २१ जून रोजी सकाळी ७ ते ८ या वेळेत योग दिनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

शासकिय यंत्रणा, पतंजली योग, योगसेवा मंडळ ,विवेकानंद केंद्र, योग असोसिएशन सोलापूर, योग साधना मंडळ, आर्ट ऑफ लिव्हिंग, भारतीय योग संस्था, श्रीरामचंद्र मिशन, योग परिषद तसेच हार्टफुलनेस आदींच्या संयुक्त विद्यमाने या योग दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती, पतंजली योग समितीच्या महिला वरिष्ठ राज्य प्रभारी तसेच कार्यक्रमाच्या प्रात्यक्षिक समन्वयक सुधा अळ्ळीमोरे यांनी दिली. आजच्या धकाधकीच्या जीवनात योगाच्या माध्यमातून आपण आपले शरीर तंदुरुस्त ठेवू शकतो. तन आणि मन यांचा एकत्रित व्यायाम म्हणजे योग. योग केल्यामुळे मनावरही चांगले संस्कार घडतात. योग आणि प्राणायाम केल्यामुळे शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्य चांगले राहते. नियमित योगा केल्यामुळे आरोग्याशी संबंधित समस्या दूर होण्यास मदत होते. यासाठी प्रत्येक व्यक्तीने दररोज काही मिनीटे योग साधना करणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे निरोगी आणि आनंदी जीवन जगण्यासाठी ऊर्जा मिळते, असेसुध्दा सुधा अळ्ळीमोरे यांनी सांगितले. मानवतेसाठी योग यंदाची थीम, असल्याचेही त्या म्हणाल्या.



### आतापर्यंतच्या थीम

सुसंवाद आणि शांतीसाठी योग, शाश्वत विकास उद्दिष्टे साध्य करण्यासाठी योग, आरोग्यासाठी योग, शांततेसाठी योग, हृदयासाठी योग, घरी योग आणि कुटुंबासह योग.

# भाजपला मिळालेले यश कार्यकर्त्यांमुळेच : आ.देशमुख

## शहर मध्यतर्फे महासंपर्क अभियान

सुराज्य/सोलापूर

पंतप्रधान मोदी यांच्यासारखे सक्षम नेतृत्व देशाला लाभले आहे. पूर्वीच्या काळात कार्यकर्त्यांनी हालअपेष्टा सहन केल्या व आज हे यश मिळाले आहे. त्यामुळे जुन्या कार्यकर्त्यांचा सन्मान केलाच पाहिजे, असे प्रतिपादन आ. सुभाष देशमुख यांनी केले.



दुरसा मंगल कार्यालयात भारतीय जनता पार्टी शहर मध्य विधानसभाच्या वतीने जनसंपर्क अभियान अंतर्गत ज्येष्ठ कार्यकर्ता संमेलन पार पडले, त्यावेळी आमदार सभा देशमुख बोलत होते. अध्यक्षस्थानी खासदार जयसिध्देश्वर महास्वामी होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी महापौर श्रीकांचना यन्नम, शहर उपाध्यक्ष भूपतीशेठ कमटम, संघटन सरचिटणीस रुद्रेश बोरामणी, जिल्हा नियोजन समिती सदस्य अशोक दुरसा, चिटणीस अनिल कंदलगी, नागेश सरगम श्रीनिवास जोगी, शहर मध्य पूर्व मंडल अध्यक्ष सुनील गौडगाव, मध्य पश्चिम अविनाश बेंजरपे आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

याप्रसंगी जय सिध्देश्वर महाराज म्हणाले, ज्येष्ठांचा अनुभव विकासासाठी, प्रगतीसाठी आणि पुढच्या पिढीच्या कल्याणासाठी नेहमीच उपयुक्त ठरतो. या संमेलनात अनेक ज्येष्ठ नागरिकांनी मांडलेली मते आणि विचार पुढील कार्यासाठी उपयुक्त ठरतील.

याप्रसंगी ज्येष्ठ कार्यकर्ते विश्वनाथ बेंद्रे यांनीही मार्गदर्शन केले. कार्यक्रमासाठी सरीता वडनाल, श्री.रामचंद्र जन्नू, राजाराम गुर्रम, विश्वनाथ बेंद्रे,बाशाभाई शेख, दत्तात्रय कल्पवृक्ष, अंबादास बिंगी, सुकुमार सिध्दम, कमल अग्रवाल, मनोहर कुरापाटी, नागनाथ सोमा, जक्कप्पा कांबळे,यादगिरी बोम्मा, बजरंग कुलकर्णी, मल्लिकार्जुन सरगम, पुरुषोत्तम नार्गेद्र रव्वा, नरेश पतंगे, भीमाशंकर पाथरूड, राजू पडल आदी उपस्थित होते. प्रास्ताविक व सूत्रसंचालन नागेश सरगम यांनी तर आभार सुनील गौडगाव यांनी मानले. कार्यक्रमासाठी रमेश यन्नम, गिरीश बत्तुल, संतोष कदम आदींनी परिश्रम घेतले.

# पायऱ्या उतरत असताना भाविक जखमी

पंढरपूर : पांडुरंगाच्या भेटीसाठी दर मजल करीत पायी चालणारे वृध्द वारकरी पंढरपुरात पोहचल्यानंतर चंद्रभागेच्या वाळवंटाकडे पायऱ्या उतरत असताना तोल जाऊन पडल्याने जखमी झाले.

बालाजी रामराव घोरवाड (वय- ६०, रा. लाद खुर्द, ता. कंधार, जि. नांडेड) असे या वारकऱ्याचे नाव आहे. यातील बालाजी घोरवाड हे आषाढी यात्रेनिमित्त पंढरपुराकडे पायी वारी करण्यासाठी चालत पंढरपुराकडे येत होते. दर मजल करीत रविवारी ते पंढरपुरात पोहचले. चंद्रभागेच्या पात्रात अंघोळ करण्यासाठी ते त्यांच्या सोबत्यांसममवेत कुंडलिक घाटाच्या पायऱ्या पार करीत असताना तोल गेल्याने ते खाली पडले. यामुळे त्यांच्या उजव्या पायाला मार लागला. त्यांना पंढरपूरच्या सरकार दवाखान्यात उपचार करुन सोलापूरला शासकिय रुग्णालयात दाखल केले आहे.